# बुद्धिबळ ऑलिम्पियाडचे पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्घाटन

**चेन्नई** : ४४व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेला गुरुवार (दि. २८)पासून चेन्नईमध्ये सुरुवात झाली



असून या स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हजेरी लावली. या वेळी पंतप्रधान मोदी यांनी स्पेशल साऊथ इंडियन लूक परिधान केला होता. मागील दोनही वर्षे कोरोनाच्या महामारीमुळे ऑनलाइन पद्धतीने पार पडलेली ही स्पर्धा यंदा ऑफलाईन चेन्नई, तामिळनाडू येथील शेरेटन महाबलीपुरम रिसॉर्ट आणि कन्व्हेन्शन सेंटर येथे होत आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे खास स्वागत केले. बुद्धिबळमधील अव्वल दर्जाचे संघ रशिया आणि चीन या स्पर्धेत नसताना भारताला अधिक विजय मिळवण्याची संधी आहे. अभिनेता रजनीकांतसह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.


शुक्रवार, २९ जुलै २०२२

◆ वर्ष १५ ◆ अंक १२

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड


## अंतरंग


'त्यांच्यावर' बोलणे म्हणजे तोंडाची वाफ दवडणे -फडणवीस/२

भाजपकडून महावितरणला आंदोलनाचा इशारा/३

रायफल शुटिंगमध्ये नवी मुंबईतील विद्यार्थी चमकणार/८


## रायगड जिल्हा परिषद आरक्षण जाहीर

# अनेक दिग्गजांचा पत्ता कट

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेची आरक्षण सोडत गुरुवारी (दि. २८) काढण्यात आली. या सोडतींमध्ये मतदारसंघ आरक्षित झाल्यामुळे अनेक दिग्गजांचे पत्ते कट झाल्याने कही खुशी कही गम असे वातावरण निर्माण झाले आहे.

रायगड जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवारी ही सोडत काढण्यात आली. उपजिल्हाधिकारी सर्जेराव म्हस्के पाटील, तहसीलदार विशाल डौंडकर यांनी त्यांना सहकार्य केले. रायगड जिल्हा परिषदेच्या नव्याने झालेल्या ६६ प्रभाग रचनेनुसार गुरुवारी आरक्षण सोडत काढण्यात आली. अनुसुचित जातीसाठी तीन, अनुसुचित जमातीसाठी १०, तर नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी १७ जागा आरक्षित करण्यात आल्या. सर्व प्रवार्गातील महिसांसाठी एकूण ५० टक्के म्हणजे ३३ जागा आरक्षित आहेत.

पाली देवद, वडघर (पनवेल), कळंब, पाथरज, उमरोली (कर्जत), हाळखुर्द, चौक (खालापूर), राबगाव (सुधागड), शिहू (पेण), जासई (उरण), कामार्ले, चेंढरे (अलिबाग), धाटाव, (रोहा), निजामपूर, मोर्बा (माणगाव), पाभरे, वरवठणे (म्हसळा), करंजाडी (महाड), लोहारे(पोलादपूर) हे मतदारसंघ खुले आहेत. महिलांसाठी राखीव ३३ जागांमध्ये अनुसूचित जाती दोन, अनुसूचित जमाती पाच, ओबीसी नऊ, खुल्या प्रवर्गासाठी १७ जागांचा समावेश आहे.



### नऊ नगर परिषदा व १५ पंचायत समित्यांचीही सोडत

खोपोली, अलिबाग, महाड, माथेरान, मुरूड जंजिरा, पेण, रोहा, श्रीवर्धन आणि उरण नगर परिषदेसाठी आरक्षण जाहीर झाले. १९६ जागांपैकी ४३ जागा ओबीसी, १२ अनुसूचित जाती तर ११ अनुसूचित जमातीसाठी आरक्षित झाल्या. १३० जागा सर्वसाधारण गटासाठी असून ६० जागा महिलांसाठी आरक्षित आहेत. १५ पंचायत समित्यांचीही आरक्षण सोडत याचवेळी जाहीर करण्यात आली.

### राजिप मतदारसंघांचे तालुकानिहाय आरक्षण

**पनवेल** : वावंजे नामाप्र वर्ग (महिला), नेरे नामाप्र वर्ग, पालीदेवद सर्वसाधारण, विचुंबे अनु. जाती (महिला), वावेघर अनु. जमाती, पळस्पे अनु. जमाती, वडघर सर्वसाधारण, गव्हाण नामाप्र वर्ग (महिला), केळवणे नामाप्र वर्ग (महिला), **कर्जत** : कळंब सर्वसाधारण, पाथरज सर्वसाधारण, उमरोली सर्वसाधारण, नेरळ नामाप्र वर्ग, सावेळे सर्वसाधारण (महिला), बीड बुद्रुक सर्वसाधारण (महिला), **खालापूर** : हाळखुर्द सर्वसाधारण, चौक सर्वसाधारण, रिस अनु. जाती, सावरोली नामाप्र वर्ग (महिला), आत्करगाव सर्वसाधारण (महिला), **सुधागड** : जांभूळपाडा सर्वसाधारण (महिला), राबगाव सर्वसाधारण, **पेण** : जिते सर्वसाधारण (महिला), दादर सर्वसाधारण (महिला), वढाव सर्वसाधारण (महिला), वडखळ सर्वसाधारण (महिला), पाबळ नामाप्र वर्ग (महिला), शिहू सर्वसाधारण, **उरण** : जासई सर्वसाधारण, चिरनेर अनु. जमाती, नवघर सर्वसाधरण (महिला), चाणजे अनु. जाती (महिला), बांधपाडा नामाप्र वर्ग, **अलिबाग** : शहापूर अनु. जमाती, कुर्डुस नामाप्र वर्ग (महिला), कामार्ले सर्वसाधारण, मापगाव नामाप्र वर्ग, थळ नामाप्र वर्ग, चेंढरे सर्वसाधारण, चौल सर्वसाधारण (महिला), बेलोशी नामाप्र वर्ग (महिला), **मुरूड** : उसरोली सर्वसाधारण (महिला), राजपूरी नामाप्र वर्ग, **रोहा** : नागोठणे सर्वसाधारण (महिला), आंबेवाडी सर्वसाधारण (महिला), निडीतर्फे अष्टमी सर्वसाधारण (महिला), वरसे अनु. जमाती (महिला), धाटाव सर्वसाधारण, **तळा** : महागाव नामाप्र वर्ग, मांदाड अनु. जमाती (महिला), **माणगाव** : तळाशेत अनु. जमाती (महिला), निजामपूर सर्वसाधारण, लोणेरे अनु. जमाती (महिला), मोर्बा सर्वसाधारण, गोरेगाव सर्वसाधारण (महिला), **म्हसळा** : पाभरे सर्वसाधारण, वरवठणे सर्वसाधारण, **श्रीवर्धन** : बोर्लीपंचतन नामाप्र वर्ग, बागमांडला नामाप्र वर्ग (महिला), **महाड** : बिरवाडी अनु. जमाती, वरंध सर्वसाधारण (महिला), नाते अनु. जमाती (महिला), वहूर नामाप्र वर्ग (महिला), कंरजाडी सर्वसाधारण, **पोलादपूर** : देवळे सर्वसाधारण (महिला), लोहारे सर्वसाधारण.

# काँग्रेस नेत्याकडून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा अपमान

## 'राष्ट्रपत्नी' म्हणून उल्लेख केल्याने भाजप आक्रमक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात काँग्रसने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा अपमान केल्याचा आरोप करीत भाजपने गुरुवारी (दि. २८) काँग्रेसच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांनी जाहीर माफी मागावी, अशी मागणी केली. अधिर रंजन चौधरी यांनी मुर्मू यांना 'राष्ट्रपत्नी' म्हटल्यावरून हा वाद निर्माण झाला. यानंतर सभागृहाचे कामकाज १२ वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले होते.



काँग्रेस नेते अधिर रंजन चौधरी यांनी बुधवारी दिल्लीत पक्षाच्या निदर्शनादरम्यान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना 'राष्ट्रपत्नी' म्हटल्याने संसदेत मोठा गदारोळ झाला. केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांनी, सोनिया गांधींवर टीका करीत माफी मागावी अशी मागणी केली. त्याचप्रमाणे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनीही आक्षेप घेतला. स्वत: एक महिला असूनही आपल्या नेत्याला अशाप्रकारे बोलण्याची परवानगी देणाऱ्या काँग्रेसच्या अध्यक्ष सोनिया गांधींनी देशासमोर येऊन देशाच्या राष्ट्रपतींचा अवमान केल्याने माफी मागावी, असे निर्मला सितारामन यांनी म्हटले. **(पान २ वर...)**

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडूनही निषेध

काँग्रेसचे लोकसभेतील खासदार अधिर रंजन चौधरी यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा 'राष्ट्रपत्नी' असा उल्लेख केल्याने लोकसभेमध्ये गोंधळ उडाला आहे. या पार्श्वभूमीवर भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी ट्वीट करून अधिर रंजन चौधरी यांनी देशाचे संवैधानिकपद, महिला आणि आदिवासी समाजाचा अपमान केला असून त्यांच्या वक्तव्याचा निषेध केला, तसेच काँग्रेसने देशाची माफी मागावी, अशी मागणी केली आहे. देशाच्या सर्वोच्च पदावर असणाऱ्या महिलेबद्दल असा शब्दप्रयोग करणे हे असंविधानिक असल्याचेही त्यांनी म्हटले.

## नेरूळ-उरण उपनगरीय मार्गिका २०२३पासून प्रवाशांच्या सेवेत

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मध्य रेल्वेवरील नेरूळ-उरण उपनगरीय चौथी संपूर्ण मार्गिका सप्टेंबर २०२२पर्यंत पूर्ण करून प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार होती, परंतु या प्रकल्पामधील दुसऱ्या टप्प्यातील खारकोपर-उरण दरम्यानच्या कामाला विलंब झाल्यामुळे आता ही कामे डिसेंबर २०२२पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे २०२३पासून ही मार्गिका प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे.

नेरुळ-बेलापूर-खारकोपर-उरण उपनगरीय रेल्वे प्रकल्प रखडला आहे. प्रकल्पामधील पहिल्या टप्प्यातील नेरूळ-बेलापूर, खारकोपरदरम्यान काम नोव्हेंबर २०१८मध्ये पूर्ण झाले आणि पहिल्या टप्प्यातील रेल्वेसेवा प्रवाशांसाठी खुली झाली.

## निवडक

### झुआरी पूल दुर्घटनेतील मृतदेह अखेर सापडले

**गोवा** : गोव्यातील झुआरी पुलावरून कोसळून झालेल्या अपघातग्रस्त कारचा शोध घेण्यात १२ तासांनंतर यश आले असून, यात गाडीतील सर्व चारही प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. हा अपघात मध्यरात्री एकच्या सुमारास घडला होता, मात्र काळोखामुळे शोधकार्य थांबवण्यात आले होते. आल्विन आरावजी, हेन्री आरावजो, प्रेसिला क्रुझ, ऑस्टिन फर्नांडिस अशी मृतांची नावे आहेत. या अपघातात कारचा चेंदामेंदा झाला.

### इराकमध्ये आंदोलकांचा संसद भवनावर ताबा

**बगदाद** : श्रीलंकेसारखी परिस्थिती आता इराकमध्येही दिसून येत आहे. इराकमध्येही उग्र निदर्शने होत आहेत. बगदादमधील संसद भवनावर बुधवारी (दि. २७) आंदोलकांनी कब्जा केला. पंतप्रधानपदाचे उमेदवार मोहम्मद शिया अल-सुदानी यांच्याविरोधात ही निदर्शने होत आहेत. बहुतेक आंदोलक शिया नेते मुक्तदा अल-सदर यांचे समर्थक आहेत.

## 'ओबीसींच्या हक्कांसाठी पुनर्विचार याचिका दाखल करू'

**मुंबई : प्रतिनिधी**

ज्या ठिकाणी ओबीसी आरक्षणाच्या निर्णयापूर्वी नगरपालिकेची निवडणूक जाहीर झाली, अशा ठिकाणी ओबीसी आरक्षण लागू करण्यास सुप्रीम कोर्टाने नकार दिला आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसींच्या हक्कांसाठी पुनर्विचार याचिका दाखल करू असे सांगितले.



देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणाचा मार्ग मोकळा करून दिला, मात्र आधी नोटीफिकेशन निघालेल्या ९१ नगरपालिकांमध्ये हे आरक्षण लागू नसल्याने आम्ही पुन्हा सर्वोच्च न्यायालयात गेलो होतो. केवळ ९१ नगरपालिकांमध्ये ओबीसी आरक्षण रद्द नको. त्यामुळे ९१ नगरपालिकांसाठी पुनर्विचार याचिका दाखल करू, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

दरम्यान थेट नगराध्यक्षांचा निर्णय आम्ही सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर घेतला. त्यामुळे या नगरपालिकांमध्ये नगराध्यक्ष ओबीसींचा होऊ शकतो, मात्र सदस्य ओबीसीचा होऊ शकत नाही, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीत ९१ नगरपालिकांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणाविना घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते.

# मागील अडीच वर्षांचा बॅकलॉग भरून काढणार -आमदार प्रशांत ठाकूर

## भाजप उत्तर रायगड अल्पसंख्याक मोर्चा बैठकीत ग्वाही

**पनवेल : वार्ताहर**

भारतीय जनता पक्ष उत्तर रायगडच्या अल्पसंख्याक मोर्चाची कार्यकारिणी बैठक गुरुवारी (दि. २८) श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या वेळी त्यांनी येणाऱ्या काळात मागील अडीच वर्षांचा बॅकलॉग भरून काढणार असल्याची ग्वाही देत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सर्वांनी साजरा करून १३ ते १५ ऑगस्टदरम्यान सर्वांनी घरावर झेंडा फडकवण्याचे आवाहन केले.



पनवेल मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात भाजप उत्तर रायगड अल्पसंख्याक मोर्चाची कार्यकारिणीची बैठक झाली. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी अनेक विषयांवर मार्गदर्शन केले. या बैठकीला भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश सचिव मन्सूर पटेल, अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष जासिम गॅस, पनवेल एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष इक्बाल काझी, पमपा माजी नगरसेवक मुकीद काझी, पापा पटेल, तळोजाचे माजी सरपंच मुनाफ पटेल, जॅन शेख, समीना साठी, जिल्हा सरचिटणीस ॲडव्होकेट इर्शाद शेख, जवाद काझी, निसार सय्यद, माजी नगरसेवक मेराज शेख, कार्यकर्ते उपस्थित होते. **(पान २ वर...)**

## अजिंक्यतारा रोप-वेला केंद्रातर्फे निधी

**सातारा : प्रतिनिधी**

अजिंक्यताऱ्यावरील मंगळाईदेवी परिसर ते खालची मंगळाई मंदिर परिसर या मार्गावर रोप-वेच्या ९२ कोटींच्या केबलसाठी केंद्राच्या निधीतून देण्याची ग्वाही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी (दि. २८) दिली.

लवकरच या रोप-वेच्या उभारणीस सुरुवात होईल, अशी माहिती खासदार उदयनराजे भोसले यांनी पत्रकाद्वारे दिली.



**पनवेल : गणेशोत्सव जवळ येत असल्याने तारा गावात असलेल्या युसूफ मेहेरअली सेंटर येथे गणपती बाप्पांच्या मूर्ती बनवून तयार आहेत. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने हवेत काहीसा गारवा जाणवत आहे. त्यामुळे गणपती बाप्पाही शेकोटीजवळ बसून ऊब घेत आहेत.** (छाया : लक्ष्मण ठाकूर)

## तलावात बुडून तरुणाचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील मांजुरणे गावातील एका ३८ वर्षीय व्यक्तीचा तलावाच्या पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि. २७) सकाळी ११.४५ वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबतची माहिती संदीप जनार्दन रणपिसे रा. मांजुरणे यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

दिलीप जनार्दन रणपिसे (वय ३८) हा मंगळवारी (दि. २६) सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास गावातून फेरफटका मारून येतो असे नातेवाईकांना सांगून गेला होता, मात्र बराच वेळ तो न परतल्याने फिर्यादी संदीप रणपिसे व नातेवाईकांनी त्याचा आजूबाजूच्या परिसरात शोध घेतला. त्यानंतर बुधवारी (दि. २७) दिलीपचा मृतदेह तलावात आढळला. त्यास उपचाराकरिता माणगाव उपजिल्हा रुग्णालय येथे दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी त्याला तपासून मृत झाल्याचे घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच, पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांनी घटनास्थळी भेट दिली. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूप्रमाणे करण्यात आली आहे.

# श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून वह्यांचे वाटप

## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने दरवर्षी शैक्षणिक उपक्रम राबवून गरिब, गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्यात येते. त्या अंतर्गत मंडळाच्या वतीने रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आणि पनवेल महापालिकेच्या गुजराती शाळेत मोफत वह्यावाटप कार्यक्रम गुरुवारी (दि. २८) आयोजित करण्यात आला होता.



या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर आणि माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या हस्ते वह्यांचे वाटप करण्यात आले.

या वाटपावेळी विद्यालयाचे चेअरमन जे. एम. म्हात्रे, माजी नगरसेवक अनिल भगत, भावेश चंदने, शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली त्रिवेदी, शिक्षिका डिम्पल ठक्कर, श्वेता मरगज, मौसमी घोडके, सुवर्णा जुनघरे, स्थानिक सल्लागार कमिटी सदस्य मनोहर मुंबईकर यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# रस्ते प्रकल्प तातडीने पूर्ण करा : मुख्यमंत्री शिंदे

## ■ मुंबई महानगर प्रदेशातील विविध रस्ते प्रकल्पांचा घेतला आढावा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महानगर प्रदेशातील रस्त्यांच्या विविध प्रकल्पांना गती देण्यासाठी या कामांची वर्गवारी करुन कमी, मध्यम मुदतीचे रस्ते प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी (दि. २८) दिले. जनतेला तत्काळ दिलासा देण्यासाठी रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर हाती घेण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी या वेळी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला बैठकीत दिल्या.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मुंबई महानगर प्रदेशातील पायाभूत सुविधा विकासकामांचा आढावा घेण्यात आला. सह्याद्री राज्य अतिथीगृहात आयोजित बैठकीस मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त इकबालसिंह चहल, महानगर आयुक्त एस. व्ही. आर. श्रीनिवास, नगरविकास विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी, ठाणे शहर पोलीस आयुक्त जय जीत सिंह यांच्यासह नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, मीरा-भाईंदर, वसई-विरार महानगरपालिकांचे आयुक्त, ठाणे, रायगड, पालघरचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिक्षक आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित या वेळी होते.

### नियमबाह्य गतिरोधक काढा; नियमांची अंमलबजावणी करा

***बदलापूर मार्गावर ठिकठिकाणी गतिरोधक करण्यात आले असून हे नियमबाह्य गतिरोधक तातडीने काढण्यासाठी नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. सार्वजनिक बांधकाम विभागाने राज्यातील सर्व प्रशासकीय यंत्रणांना गतिरोधकांसंदर्भातील नियमांची अंमलबजावणी करण्याच्या सूचना द्याव्यात, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बोलताना सांगितले. दरम्यान, या बैठकीत विविध सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.***

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुख्य गोदामे, लॉजिस्टिक्स केंद्रे, कंटेनर-ट्रक टर्मिनल्समुळे होणारी वाहतूककोंडी लक्षात घेता त्यावर तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. ज्या भागात वाहनांची जास्त रहदारी असल्याने वाहतूककोंडी होते, त्या भागातील वाहतुकीचा भार कमी करण्यासाठी रस्ते आणि अनुषंगिक प्रकल्पांना गती द्यावी, नव्या प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तातडीने शासनाकडे सादर करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी दिले. दरम्यान, वसई-विरार मल्टीमोडल कॉरिडॉरमुळे भिवंडी-कल्याण-डोंबिवली-उल्हासनगर या भागातील वाहतूककोंडी मोठ्या प्रमाणात कमी होणार असून त्याबरोबरच त्या भागाच्या विकासालादेखील चालना मिळणार आहे, त्यामुळे हा प्रकल्प गतीने पूर्ण करण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी दिल्या. आनंदनगर टोल नाका ते साकेत मार्ग, कोपरी-पटणी पूल, तीन हात नाका मार्गाची पुनर्बांधणी, भिवंडी जोडणारा पूल, ठाणे कोस्टल मार्ग, ऐरोली बोगदा ते काटई नाका मार्ग हे प्रकल्प जलदगतीने करण्यात येणार असून या प्रकल्पांमुळे वाहतूककोंडी दूर होण्यास मोठी मदत होणार असल्याचेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.



चिंचोटी ते अंजूर फाटा मार्गामुळे ठाण्यातील वाहतूकीचे विभाजन होऊन ठाण्यातील वाहतूक कोंडी दूर होणार आहे. या मार्गाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असून त्यांनी हा प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिल्या.

शीळ फाटा ते मानकोली, कल्याण ते बापगाव, कल्याण ते टिटवाळा, कल्याण ते पडघा, टिटवाळा ते बदलापूर हे रस्ते प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर कल्याण, डोंबिवली, ठाण्यातील वाहतूककोंडी दूर होणार असल्याचेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

# तंत्रज्ञानाच्या सहाय्याने स्पर्धेत टिकून राहणे शक्य : वाघमारे

## ■ 'उज्ज्वल भारत, उज्ज्वल भविष्य' पॉवर २०४७ कार्यक्रम उत्साहात

**मुंबई : प्रतिनिधी**



जगभरात वीजक्षेत्रात आमुलाग्र बदल घडत आहे. या बदलांना सामोरे जात शासकीय वीज कंपन्यांना स्पर्धेत टिकून राहायचे असल्यास अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करावे लागेल. महापारेषणमध्ये आता ड्रोनच्या सहाय्याने वीज वाहिन्यांची तपासणी केली जाते. महावितरणदेखील स्मार्ट मीटर आणि आधुनिक जीआयएस माध्यमातून बदल घडवून आणत आहे तर महानिर्मितीचे सर्व संच मेरिट ऑर्डर डिस्पॅचमध्ये आले असून या संचांनी विक्रमी वीजनिर्मिती केली आहे, अशा अनेक बदलांमुळे महाराष्ट्रातील वीज क्षेत्राला नवी उभारी मिळणार असल्याचे राज्याचे प्रधान सचिव (ऊर्जा) तथा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दिनेश वाघमारे यांनी सांगितले.

भारत सरकारच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा विभागांतर्गत 'उज्ज्वल भारत, उज्ज्वल भविष्य' पॉवर २०४७ या अभिनव संकल्पनेंतर्गत महावितरणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगड येथे या ऊर्जा महोत्सवाचे आयोजन करण्यात होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल होते. या ऊर्जा महोत्सवाच्या कार्यक्रमात विविध योजनेतील लाभार्थ्यांचा सत्कार करण्यात आला, राज्यातील तिन्हीही कंपन्या एकमेकांशी निगडीत असून या कंपन्यांनी एकत्रित काम करण्याची गरज असल्याचे दिनेश वाघमारे यांनी या वेळी सांगितले.

मागील वर्षभरात महावितरणने वीजहानीचे प्रमाण २१ टक्क्यांवरून १५ टक्के आणले असून फोटो मीटर रिडींगमधील चुका टाळण्यासाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे महिन्याला सुमारे २०० ते २५० कोटींनी वीज बिलींग वाढले आहे. महावितरणच्या कर्मचाऱ्यांमध्ये अतिशय चांगले काम करण्याची क्षमता असून ती ओळखून त्या पध्दतीने काम करण्याचे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी केले. यावेळी महावितरणने केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या राबविलेल्या विविध योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी महावितरणमधील मृत व वैद्यकीयदृष्टया अपात्र कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना त्यांच्या अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा प्रस्ताव संबंधित कार्यालयांकडे सादर केल्यानंतर त्याला या प्रस्तावाची सद्यस्थिती कळवावी. तसेच प्रस्ताव मंजूर होण्यामध्ये पारदर्शकता राहावी या उद्देशाने माहिती तंत्रज्ञान व मानव संसाधन विभागाने तयार केलेल्या अनुकंपा नियुक्ती पोर्टलचा शुभारंभ दिनेश वाघमारे आणि विजय सिंघल यांच्या हस्ते करण्यात आला. या पोर्टलमुळे महावितरणच्या मुख्यालयात एका क्लिकवर प्रलंबित प्रकरणांची अद्ययावत माहिती उपलब्ध होणार आहे तसेच अवलंबितांनादेखील त्यांच्या प्रकरणाची अद्ययावत स्थिती बघणे शक्य होईल.

महावितरणचे संचालक (वाणिज्य) डॉ. मुरहरी केळे, महानिर्मितीचे संचालक (संचालन) चंद्रकांत थोटवे, महापारेषणचे संचालक (संचलन) अनिल कोलप यांनीदेखील उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी महापारेषणचे संचालक (प्रकल्प) नसीर कादरी, संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे यांच्यासह अन्य तिन्ही कंपन्यांचे संचालक उपस्थित होते. यावेळी केंद्र सरकारच्या ऊर्जाविषयक विविध योजना व महावितरणने राबविलेल्या योजनांवरील माहितीपट आणि पथनाट्चे सादर करण्यात आली. कार्यक्रमाला तिन्हीही वीज कंपन्यांचे संचालक, वरिष्ठ अभियंते, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालक (मानव संसाधन) डॉ. नरेश गिते यांनी तर आभार कार्यकारी संचालक (वितरण) अरविंद भादीकर यांनी मानले.

# 'त्यांच्यावर' बोलणे म्हणजे तोंडाची वाफ दवडणे

## ■ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची संजय राऊतांच्या सत्तांतराच्या वक्तव्यावर टीका



**मुंबई : प्रतिनिधी**

आम्ही त्यांच्यावर काही बोलणे म्हणजे आमच्या तोंडाची वाफ गमावणे असे होईल अशी टीका आज (दि. २८) रोजी यांनी शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांचे नाव न घेता त्यांच्यावर केली आहे. मुंबई येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

राज्यात सत्ता बदल झाल्यानंतर खासदार संजय राऊत हे विरोधकांवर सतत आरोप करत आहेत. त्यांनी गुरुवारीही आरोप केले. यामध्ये दुसऱ्या पक्षात विलीन होण्यास किती आमदार मानसिकदृष्ट्या तयार आहेत याची आम्हाला कल्पना आहे. आमदार आमच्या संपर्कात आहेत, असा दावा संजय राऊत यांनी करतानाच भविष्यात पुन्हा एकदा महाराष्ट्रात सत्तापरिवर्तन झाले तरी आश्चर्य वाटण्याची गरज नाही असेही राऊत म्हणाले. राऊतांच्या या वक्तव्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वरिल प्रतिक्रीया देताना, आमचीच सत्ता येईल असे म्हणणारे भाबडे आहेत. त्यांच्यावर बोलणे म्हणते तोंडाची वाफ घालविण्यासारखे आहे. त्यामुळे आपण काही बोलणार नाही असेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. ओबीसी आरक्षणाबाबत म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाच्या 'त्या' निर्णयाविरोधात सरकार पुनर्विचार याचिका दाखल करणार अशीही माहिती उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी गुरुवारी बोलताना दिली.

# गव्हाण विद्यालयात दिव्यांचे प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये आषाढी अमावस्या अर्थात दीप अमावस्येनिमित्त विद्यार्थ्यांनी स्वत: तयार केलेल्या व सजविलेल्या आकर्षक व रंगीबेरंगी दिव्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.



विद्यालयाच्या प्राचार्य साधना डोईफोडे यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले, तसेच 'रयत'चे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, पर्यवेक्षक दीपक भर्णुके, इयत्ता दहावी क चे वर्ग शिक्षक आणि गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, विद्यालयाचे लेखनिक चंद्रकांत मढवी, ग्रंथपाल महेश म्हात्रे तसेच कर्मचारी जनार्दन खैरे व डी. आर. ठाकूर, आप्पा व दयानंद खारकर आदींच्या हस्तेदेखील दिवे प्रज्वलीत करण्यात आले.

आषाढ महिन्याच्या शेवटी व श्रावण महिन्याच्या आदल्या दिवशी येणाऱ्या अमावस्येला आषाढी अमावस्या किंवा दीप अमावस्या संबोधले जात असल्याची माहिती सांगून ज्योत्स्ना ठाकूर यांनी निसर्गातील बदलानुसार आहाराच्या योग्य सवयी लागून उत्तम आरोग्य राखण्यासाठी तसेच जीवनातला अज्ञानरूपी अंधकार दूर करण्यासाठी ज्ञानाचे प्रेरणादायी दीप प्रज्वलीत व्हावेत अशा शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख व संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर आणि सांस्कृतिक विभागाच्या सहायक हर्षला पाटील यांनी परिश्रम घेतले.

# अलिबाग तालुक्यातील वावे नाका येथील गटार काढून मोरी बांधा

## सार्वजनिक बांधकाम विभागाकडे भाजपची मागणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील वावे नाका येथील गटार काढून मोरी बांधा अशी मागणी भाजपने केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता राजीव डोंगरे यांना निवेदन देण्यात आले.

भाजपचे ओबीसी सेल तालुकाध्यक्ष अशोक वारगे, भाजपा तालुका चिटणीस शरद थळे, वावे ग्रामस्थ महेंद्र पाटील, रुपेश गावंड या वेळी उपस्थित होते. ग्रुप ग्रामपंचायत बेलोशी-तालुका अलिबाग हद्दीत वावे ते रेवदंडा रस्त्यावर वावे नाका येथे मोरी बंद असल्यामुळे सांडपाणी, पावसाचे पाणी व कचरा मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर साठ्ला जातो. त्यामुळे तेथील नागरिकांना व प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होतो. तसेच या जागेवर दुचाकी तीन चाकी वाहने चालविण्यास अडचण येते. दुर्गंधीमुळे जनता त्रस्त झाली आहे. मोरी बंद असलेल्या जागेवर पावसाचे पाणी जमून मोठ्या प्रमाणे खड्डा तयार झालेला आहे. त्यामुळे अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येथे मोरी बांधणे आवश्यक असल्याचे या निवेदनात म्हटले आहे. दरम्यान, वावे नाका येथे मोरी लवकर बांधावी अन्यथा भारतीय जनता पक्षातर्फे रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.



# आपटा ग्रामसभा तहकूब

**रसायनी : प्रतिनिधी**

आपटा ग्रामपंचायतची हर घर झेंडा उपक्रम या विषयावर ग्रामसभा गुरुवारी (दि. २८) दुपारी आयोजित करण्यात आली होती, परंतु ही ग्रामसभा तहकूब झाली. या सभेत केवळ दोन सदस्य गैरहजर होते. पुरुष मंडळींपैकी दोघे उपस्थित होते. ३० ते ३५ महिला उपस्थित होत्या. याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

पान १ वरून

## काँग्रेस नेत्याकडून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंचा अपमान

अधिर रंजन चौधरी यांनी या प्रकरणात माफी मागितली असून चुकून आपण तो शब्द वापरल्याचे म्हटले, तर सोनिया गांधी यांनी घडलेल्या गोष्टीबद्दल अधिर रंजन चौधरींनी माफी मागितली आहे, अशी प्रतिक्रिया नोंदवली.

दरम्यान आम आदमी पक्षाच्या तीन खासदारांना राज्यसभेतून निलंबित करण्यात आले आहे. याशिवाय अपक्ष खासदार अजितकुमार भुयान यांच्यावरही निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. बुधवारी संजय सिंह यांनाही निलंबित केले होते. राज्यसभेच्या कामकाजात आतापर्यंत २३ खासदारांना निलंबित करण्यात आले आहे.

## मागील अडीच वर्षांचा बॅकलॉग भरुन काढणार -आमदार प्रशांत ठाकूर

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, हा देश आपल्या सर्वांचा आहे. या भावनेतून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्ष काम करीत आहे. सर्व धर्मांचा आदर राखला गेला पाहिजे, विशेष करून जो मुस्लिम समाज अनेक वर्षांपासून देशात राहत आहे, त्या समाजाविरोधात कोणी वक्तव्य केले असेल तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. यामध्ये पक्षात कोणतेही दुमत नाही, तसेच देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आपल्या सर्वांचा आहे. त्यामुळे १३ ते १५ ऑगस्ट कालावधीत प्रत्येक घरात झेंडा फडकवला पाहिजे, असे त्यांनी आवाहन केले, तर माजी नगरसेवक मुकीद काझी यांनी मुस्लीम समाज हा भारतीय जनता पक्षाबरोबर राहणार असल्याचे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमात जिल्हा सरचिटणीस ॲड. इर्शाद शेख यांनी उत्तर रायगड जिल्ह्यातील सर्व मुस्लिम समाजाच्या कब्रस्तानच्या संरक्षण भिंती व त्यांच्या सुशोभिकरणासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा, यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे निवेदन सुपूर्द केले.

**उरण नगरपरिषद, उरण**
**ता. उरण, जिल्हा - रायगड पिन कोड - ४०० ७०२**
**दूरध्वनी क्रमांक : २७२२२३२०**
Email ID : uranmunicipal@gmail.com

जा.क्र.:उनप/सा.प्र.वि./सुधा. आरक्षण सोडत/१६९९/२०२२-२०२३ दिनांक :- २८/०७/२०२२

**जाहीर नोटीस**

**मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. रानिआ/नप-२०२२/प्र.क्र. ०२/का.६, दि. २२ जुलै २०२२** अन्वये राज्यातील ११५ नगरपरिषदा व ९ नगरपंचायतींमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) आरक्षण व सोडतीचा सुधारीत कार्यक्रम २०२२ जाहीर करण्यात आला आहे.

त्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील खोपोली, अलिबाग, महाड, माथेरान, मुरूड जंजिरा, पेण, रोहा, श्रीवर्धन व उरण या नगरपरिषदमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) आरक्षण व सोडतीची कार्यवाही दि. २८/०७/२०२२ (गुरुवार) रोजी पार पडली आहे.

सदर आरक्षण व सोडतीबाबत हरकत व सूचना स्विकारणेकामी आरक्षणाची अधिसूचना नगरपरिषद व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर तसेच नगरपरिषद व इतर कार्यालयाच्या सूचनाफलक इ. वर प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

ठिकाण :- रायगड - अलिबाग
दिनांक :- २८/०७/२०२२

**सही/-**
**(डॉ. महेंद्र कल्याणकर)**
**जिल्हाधिकारी रायगड, अलिबाग**

**टिप :-** नगरपरिषदेचे आरक्षण व सोडतीबाबत हरकत व सूचना स्विकारणेकामी आरक्षणाची अधिसूचना परिशिष्ट नागरिकांच्या माहितीसाठी http://uranmahaulb.maharashtra.gov.in या वेबसाईटवर तसेच नगरपरिषदेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यांत आलेली आहे.



**पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत शुक्रवार, दि. २९ जुलै २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स**

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर ■ ५. सीकेटी हायस्कूल, न्यू पनवेल
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ७. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ८. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ९. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल ■ १०. आंबेडकर भवन, पनवेल
- ११. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- १२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)

**ग्रामीण लसीकरण**

■ टेंभोडे ■ भोईरपाडा/पेठाली ■ देवीचा पाडा ■ फणसवाडी/चाफेवाडी ■ खांदा गाव ■ तळोजे मजकूर फरशीपाडा

**ग्रामीण लसीकरण सत्रांत दि. २५.०७.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये पहिला, दुसरा व बुस्टर डोस लाभार्थ्यांसाठी उपलब्ध असणार आहे.**

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

# भाजपचा महावितरणला आंदोलनाचा इशारा

## वायरमन, लाईनमनची रिक्त पदे १५ दिवसांत भरा; आमदार प्रशांत ठाकूर यांचे निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येत्या पंधरा दिवसांत वायरमन व लाईनमनची रिक्त पदे भरण्यासंदर्भात कार्यवाही केली नाही तर आंदोलन करण्याचा इशारा भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीला दिले आहे. तशा आशयाचे त्यांचे निवेदन गुरुवारी (दि. २८) भाजपचे तालुका सरचिटणीस व माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, युवा नेते योगेश लहाने यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहे.



या निवेदनात म्हटले आहे की, पनवेल तालुक्यातील उसर्ली खुर्द, शिवकर, चिखले, कोळखे, कोन, भिंगार, वारदोली या ग्रामपंचायत हद्दीतील कोळखे, पेठ, पळस्पे फाटा, चिखले, सांगडे, भिंगार, भिंगारवाडी, शेडूंग, भेरले, वारदोली, बेलवली, ठाकूरवाडी, कोन, बोर्ले, अजिवली, उसर्ली खुर्द, डेरवली या गावांमध्ये विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीने गेल्या दिड ते दोन महिन्यांपासून वायरमन व लाईनमन ही दोन्ही पदे रिक्त असल्यामुळे सध्याच्या मुसळधार पडत असलेली पावसाची परिस्थिती पाहता नागरिकांना विद्युत संदर्भातील अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

या विभागातील ग्रामस्थांनी विद्युत मंडळाच्या अधिकाऱ्यांकडे प्रत्यक्ष बाब निदर्शनास आणूनसुद्धा अद्यापपर्यंत ही पदे रिक्त आहेत. त्यामुळे या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन आणि पावसाळ्याची परिस्थिती पाहता वायरमन व लाईनमनची रिक्त पदे भरण्यासंदर्भात येत्या १५ दिवसांत कार्यवाही व्हावी, अन्यथा स्थानिक पदाधिकाऱ्यांमार्फत आंदोलन करण्यात येईल, असे या निवेदनातून अधोरेखित करण्यात आले आहे.

### पनवेल पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुक

## महिलांसाठी नऊ जागा आरक्षित

**पनवेल : वार्ताहर**



पनवेल पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी गुरुवारी (दि. २८) आरक्षण जाहीर झाले आहे. पनवेल पंचायत समितीच्या १८ जागांपैकी नऊ जागा महिलांसाठी आरक्षित झाल्या आहेत.

यामध्ये सर्वसाधारण महिलांसाठी चार जागा, नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी दोन जागा, अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी दोन जागा तर अनुसूचित जातीच्या महिलांसाठी एक जागा आरक्षित झाली आहे. याशिवाय सर्वसाधारण जागेसाठी सहा जागा, तर नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी दोन जागा राखीव, अनुसूचित जमातीसाठी एक जागा आरक्षित झाली आहे.

पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आरक्षण सोडतीचा कार्यक्रम झाला. त्यानुसार पनवेल पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी जाहीर झालेले आरक्षणाप्रमाणे सर्वसाधारण (स्त्री)– वांवजे, आदई, पालीदेवद, कोळखे; नागरिकांचा मागास प्रवर्ग (स्त्री)– नेरे, गव्हाण; अनुसूचित जमाती (स्त्री)–पाले बुद्रुक, पोयंजे; अनुसूचित जाती (स्त्री)–विचूंबे; सर्वसाधारण– दुंदरे, वावेघर, पळस्पे, वडघर, केळवणे, आपटा; नागरिकांचा मागास प्रवर्ग–ओवळे, वहाळ; अनुसूचित जमाती–शिरढोण असे केले आहे.

## उरणमध्ये दहा गणांचे आरक्षण जाहीर

**उरण : प्रतिनिधी**

उरण पंचायत समितीच्या १० गणांचे आरक्षण गुरुवारी (दि. २८) सोडत पद्धतीने काढून जाहीर करण्यात आले. उरण पंचायत समितीच्या १० जागा आहेत. या दहाही गणांची सोडत पद्धतीने आरक्षण काढण्यात आले.

उरण गटविकास कार्यालयातील सभागृहात उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके यांच्या उपस्थितीत आरक्षणाच्या सोडतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी उरण तहसीलदार भाऊसाहेब अंधारे, गटविकास कार्यालयातील अधिकारी आदी उपस्थित होते.

गण क्रमांक ५७ जसखार–ना.मा.प्र. (महिला), गण क्रमांक ५८ जासई–सर्वसाधारण (महिला), गण क्रमांक ५९ विंधणे–सर्वसाधारण (महिला), गण क्रमांक ६० चिरनेर–सर्वसाधारण, गण क्रमांक ६१ नवघर–ना.मा.प्र., गण क्रमांक ६२ म्हातवली–अनु.जमाती (महिला), गण क्रमांक ६३ केगाव–सर्वसाधारण, गण क्रमांक ६४ चाणजे–सर्वसाधारण (महिला), गण क्रमांक ६५ बांधपाडा–सर्वसाधारण, गण क्रमांक ६६ आवरे–सर्वसाधारण, असे सोडत पद्धतीने काढण्यात आलेले आरक्षण जाहीर करण्यात आले आहे.

उरण पंचायत समितीमध्ये याआधी आठ गण होते. त्यामध्ये यावर्षी येत्या निवडणुकीसाठी दोन गणांची वाढ झाली आहे. त्यामुळे पंचायत समितीची सदस्य संख्या १०वर पोहचली आहे.

## पनवेलमधील ओएनजीसी ते शिवकर मोहा रस्ता झाला खड्डेमुक्त!

### भाजपच्या आनंद ढवळे यांचा पुढाकार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील ओएनजीसी ते शिवकर मोहा रस्त्याला जोडणाऱ्या पुलावर पडलेले खड्डे स्वखर्चाने बुजविण्याचे काम युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे यांनी केले आहे. त्यामुळे अखेर खड्डे बुजले... आनंद ढवळे यांच्या पुढाकाराने, अशी समाधानकारक प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.



पनवेल महामार्गाला लागून ओएनजीसी मार्गे शिवकर मोहा रस्ता आहे. या रस्त्याला जोडणारा एक पूल असून पावसाळ्याच्या जोराने खड्डे पडले होते. त्यामुळे येथील वाहनचालक, प्रवासी व पादचाऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. आणि विशेषत्वाने शिवकर ग्रामपंचायत आदर्श ग्रामपंचायत म्हणून उल्लेखित आहे. या ठिकाणी शेकापची सत्ता आहे, मात्र विकासाच्या दृष्टिकोनातून या ठिकाणी बोंबाबोंब पहायला मिळते. या ठिकाणी ग्रामपंचायतींनीही खड्डे बुजवण्यास पुढाकार न घेतल्याने अखेर युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वखर्चाने या पुलावरील खड्डे काँक्रीट पद्धतीने बुजवले.

याकामी आनंद ढवळे यांना मारुती पाटील, तुकाराम टोपले, जगदीश ढवळे, भरत पाटील, नामदेव तुपे, धर्मा तुपे, अक्षय पाटील, अरविंद माळी, प्रांजल पाटील, अमित पाटील, मच्छींद्र तुपे, जीलानी शेख यांचेही सहकार्य लाभले. त्यामुळे आनंद ढवळे व सहकाऱ्यांचे ग्रामस्थ तसेच वाहनचालक, प्रवाशांनी आभार व्यक्त केले.



**पनवेल : आमदार महेश शेठ बालदी यांच्या संकल्पनेतून आदिवासी वाड्या–पाड्यांमध्ये दवाखानासारखी सोयीसुविधा मिळावी ह्या हेतूने फिरता दवाखाना चालू करण्यात आला. ही सुविधा आपटा (सारसई), माढभुवन आदिवासी भागात सुरू करण्यात आली. या वेळी भाजप तालुका उपाध्यक्ष संजय टेंबे, आपट्याचे माजी सरपंच दत्ता पाटील, पंकज शहा, प्रदीप भोईर, डॉक्टर आणि कार्यकर्ते उपस्थित होते.**



## वर्षा सहलीसाठी गेलेल्या युवकाचा नदीत बुडून मृत्यू

**पनवेल :** वर्षा सहलीसाठी तालुक्यातील शांतीवन–भानघर येथील गाढी नदीत पोहण्यास उतरले असता एका व्यक्तीचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.

अनिल चव्हाण (वय ३५, रा. मानखुर्द) असे या युवकाचे नाव असून तो त्याच्या सहा ते सात सहकाऱ्यांसोबत वर्षा सहलीसाठी तालुक्यातील शांतीवन–भानघर येथील गाढी नदी पोहण्यास उतरला होता. यादरम्यान, त्याचा पाय घसरून व पाण्याचा अंदाज न आल्याने पाण्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून शाळांमध्ये उपक्रम

## पडघे येथे वह्यांचे मोफत वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार यांचा ५ ऑगस्ट रोजी वाढदिवस आहे. त्यानिमित्त सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर रायगड जिल्हा परिषदेच्या पडघे येथील शाळेत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले.



या वेळी पडघे माजी सरपंच कृष्णा पाटील, भाजप तालुका उपाध्यक्ष सचिन पाटील, भाजप युवा मोर्चा सरचिटणीस दिनेश खानावकर, प्रभाग क्रमांक ९ अध्यक्ष सचिन चौधरी महादेव गडगे, दिलीप भोईर, गजानन पाटील, पांडुरंग भोईर, शंकूनाथ भोईर राजू कडू, प्रल्हाद भोईर, पवन भोईर, अशोक गडगे, नाथा पाटील, यशवंत भोईर यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

## मोठीजुई येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप

**उरण : वार्ताहर**

उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवस १७ जुलै रोजी झाला. तरीही उरण मतदार संघात विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविले जात आहेत. त्यानुसार रायगड जिल्हा परिषदेच्या मोठीजूई येथील शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले.

आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल यांच्या सौजन्याने बुधवारी (दि. २७) रायगड जिल्हा परिषदेच्या मोठीजूई येथील शाळेत विद्यार्थ्यांना सरपंच विशाखा लहु भोईर, भाजप कार्यकर्ता हरिश्चंद्र पोषा पाटील यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.



या वेळी सरपंचांसह ग्रामपंचायत सदस्य, भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.





**पनवेल : भाजप तालुका उपाध्यक्ष गुरुनाथ भोपी यांना वाढदिवसानिमित भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी ग्रामपंचायत सदस्य रूपेश भोईर, तसेच पदु वाघ, गणेश भोपी, रवींद्र पाटील आदी उपस्थित होते .**



**पनवेल : महापालिका क्षेत्रातील ओवेकॅम्प गावामध्ये रस्ते, स्मशानभुमी, शौचालय, शाळा दुरुस्ती, पथदिव्यांची कामे करण्यात येत आहेत. त्यापार्श्वभुमीवर माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी अधिकाऱ्यांसह मंगळवारी पाहणी करून सूचना दिल्या व पाण्याच्या प्रश्नासंदर्भात चर्चा केली. या वेळी माजी नगरसेवक हरेश केणी, युवा मोर्चा खारघर तळोजा अध्यक्ष विनोद घरत, शहर अभियंता संजय कटेकर, विठ्ठल मढवी, प्रवीण पाटील, प्रितम पाटील, रवी म्हात्रे, नंदू म्हात्रे, जितू मढवी यांच्यासह पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.**

## गव्हाण विद्यालयात शिक्षक, पालकांचा मेळावा

### शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मधील शिक्षक पालक संघ, माता पालक संघ व गुरूकुल पालक संघाचा संयुक्त मेळावा विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व 'रयत'चे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत यांच्या अध्यक्षतेखाली झाला.



शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्यात समन्वय साधून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकासासह आरोग्याचाही विकास हे महत्त्वाचे उद्दिष्ट गाठणे सहजसाध्य असून पालकांनी अधिक सतर्क राहण्याची आवश्यकता अरूणशेठ भगत यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात अधोरेखित केली. तसेच शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्षपदी फेरनिवड झालेले उपाध्यक्ष नामदेव ठाकूर यांनी कोरोनाच्या काळात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क स्वतः भरल्याचा आवर्जून उल्लेख केला.

प्राचार्या साधना डोईफोडे यांनी प्रास्ताविक भाषणात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच विद्यालयाच्या भौतिक व आर्थिक परिस्थितीचाही आढावा घेतला, तर गुरूकुल पालक संघाचे सचिव आणि विद्यालयाच्या अनिवासी गुरूकुल प्रकल्पाचे प्रमुख संदीप भोईर यांनी गुरुकुल प्रकल्पाचे उद्देश स्पष्ट करून संस्थेमधील विद्यार्थ्यी गुणवत्ता वृद्धीसाठी हा महत्त्वाचा प्रकल्प असल्याचे प्रतिपादन करून ह्या प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.

भारताच्या स्वातंत्र्याचे हे अमृतमहोत्सवी वर्ष असल्याने 'घर घर तिरंगा' या अभियानासोबतच प्रभातफेरी व इतर देशभक्ती पर उपक्रम राबविण्यात येणार असून त्यासाठी सोबतच पालकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा असे प्रतिपादन विद्यालयाचे उपशिक्षक सागर रंधवे यांनी केले. लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर यांचेही समयोचित भाषण झाले.

पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्षपदी नामदेव ठाकूर यांची फेरनिवड करण्यात आली. पालक प्रतिनिधी म्हणून अपर्णा सतिश नाईक, शिक्षक प्रतिनिधी सहसचिव प्रमोद कोळी यांची निवड झाली. तसेच माता पालक संघाचे सहसचिवपदी दीपाली दीपक गवळी यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

या संयुक्त मेळाव्यात स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर, विद्यालयाचे पर्यवेक्षक दीपक भर्णुके, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, शिक्षक पालक संघाचे सचिव देवेंद्र म्हात्रे, माता पालक संघाच्या सचिव जे. एच. माळी व गुरूकुल प्रमुख संदीप भोईर, क्रीडाशिक्षक जयराम ठाकूर तसेच तिन्ही संघाचे पालक प्रतिनिधी उपस्थित होते. मेळाव्याचे सूत्रसंचालन शिक्षक पालक संघाचे सचिव देवेंद्र म्हात्रे यांनी केले, तर प्रमोद कोळी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## कामोठे वसाहतीमधील मैदानाची स्वच्छता

### विकास घरत यांचा पाठपुरावा

**पनवेल : वार्ताहर**

नगरसेवक विकास घरत यांनी कामोठे वसाहतीमधील मैदान तातडीने स्वच्छ करून घेतले.

कामोठे वसाहतीमधील सेक्टर ३६, या ठिकाणी असलेल्या तुकाराम मंदिरसमोरील मैदानात अस्वच्छता पसरली होती, यामुळे या मैदानाचा वापर करता येत नव्हता. या बाबतची माहिती स्थानिक रहिवासीयांनी माजी नगरसेवक विकास घरत यांना देताच त्यांनी त्वरित त्या ठिकाणी आपल्या कार्यकर्त्यांसोबत जाऊन जेसीबी लावून मैदान स्वच्छ करून दिले. यानंतर हे मैदान वापरासाठी उपलब्ध करून दिले. त्याबद्दल स्थानिक रहिवासीयांनी विकास घरत यांचे आभार मानले आहे.



## तोंडरे येथून एक जण बेपत्ता

**तळोजा :** तोंडरे येथून ५५ वर्षीय व्यक्ती घरातून निघुन गेल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. प्रकाश काशिनाथ सोनार (वय ५५, रा. तोंडरे) हे राहत्या घरातून निघुन गेले असून ते परत न आल्याने त्यांच्या भावाने पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार केली. प्रकाश सोनार यांची उंची पाच फूट, बांधा मजबुत, वर्ण सावळा, चेहरा गोल, दोन दात पडलेले असून नाक मोठे आहे. तसेच डोक्यावर अर्धवट टक्कल, मिशी मध्यम असून त्यांनी अंगात राखाडी टी शर्ट व पांढरी पँट तसेच पायात चप्पल घातलेली आहे. या व्यक्तीबाबत कोणास माहिती असल्यास त्यांनी तळोजा पोलीस (०२२२७१४२३३३) किंवा पोलीस हवालदार वालचंद शिंदे ९९६७५७०८८५ यावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## संपादकीय

# ही गुर्मी येते कुठून?

गेल्या आठ वर्षांत इतके फटके खाऊनदेखील काँग्रेसजनांना अजुन शहाणपण येत नाही, याला काय म्हणावे? राष्ट्रपतींच्या अपमानावरून देशभर संतापाची लाट उसळूनही अधीर रंजन चौधरी आणि श्रीमती सोनिया गांधी यांनी संसदेची माफी मागितली नाही. जनतेने वारंवार लाथाडूनही या पक्षाच्या नेत्यांमधील उर्मटपणा काही कमी होताना दिसत नाही असे वारंवार घडताना दिसते.

**काल-परवापर्यंत महागाई आणि बेरोजगारीच्या मुद्द्यांवर मोदी सरकारला घेरण्याची भाषा करणारा काँग्रेस पक्ष स्वत:च्या नेत्याला सक्तवसुली संचलनालयाचे निमंत्रण आल्याबरोबर पार बदलला. जनहिताच्या मुद्यांवरील आंदोलने काही तासांत विसरली गेली आणि स्वत:च्या नेत्यांना वाचवण्यासाठी काँग्रेस नेते रस्त्यावर उतरले. सक्तवसुली संचलनालय ऊर्फ ईडीने नॅशनल हेराल्डप्रकरणी काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांची चौकशी सुरू केली आहे. एकूण तीन वेळा त्यांना ईडीने बोलविले. या तिन्ही वेळा काँग्रेस नेते, खासदार, आमदार आणि काही तुरळक कार्यकर्ते आंदोलनाच्या निमित्ताने रस्त्यावर आले. राजधानी दिल्लीत धरणे आंदोलन करताना काँग्रेसचे नेते अधीर रंजन चौधरी यांनी आपल्या प्रकांड बुद्धिमत्तेचे तारे तोडले. एका खासगी वृत्तवाहिनीशी बोलताना त्यांनी महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांचा 'राष्ट्रपत्नी' असा हिणकस उल्लेख केला. त्यावरून देशभर संतापाची लाट उसळली आहे. अधीर रंजन चौधरी हे गृहस्थ आक्रस्ताळे आणि बेताल बोलण्यासाठी कुप्रसिद्ध आहेतच. गेले तीन दिवस महागाई आणि श्रीमती सोनिया गांधी यांच्या विरोधात सुरू असलेल्या ईडी कारवाईच्या मुद्यावर काँग्रेस आणि अन्य विरोधकांनी संसदेचे कामकाज होऊ दिले नव्हते. महागाईसारख्या मुद्यावर सरकारला अडचणीत आणणारे प्रश्न विचारणे हे विरोधकांचे कर्तव्यच आहे हे समजून घेण्याजोगे आहे. परंतु श्रीमती गांधी आणि एकंदर गांधी परिवार यांच्या बचावासाठी संपूर्ण संसद वेठीला धरणे निषेधार्हच मानायला हवे. त्यात चौधरी महाशयांनी राष्ट्रपती मुर्मू यांचा अवमानजनक उल्लेख करून आगीत आणखी तेल ओतले. गेले तीन दिवस विरोधीपक्षांचे तांडव बघत शांतपणे बसलेल्या भारतीय जनता पक्षाच्या खासदारांनी गुरूवारी आपला उग्र अवतार दाखवला. राष्ट्रपतींच्या अवमानाबद्दल अधीर रंजन चौधरी आणि श्रीमती सोनिया गांधी या दोघांनीही बिनशर्त माफी मागितली पाहिजे अशी मागणी भाजप खासदारांनी लावून धरली. त्यामुळे उद्भवलेल्या गोंधळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले. संसदेच्या परिसरात श्रीमती सोनिया गांधी आणि केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांच्यामध्ये जाहीर ठिणग्या उडालेल्या दिसल्या. श्रीमती गांधी यांना नम्रपणे प्रश्न विचारूनही इराणी यांना 'तुम्ही माझ्याशी बोलू नका' असे श्रीमती गांधी यांनी सुनावले. त्यानंतर काँग्रेस नेत्यांच्या उर्मटपणाला सीमाच उरलेली नाही. माझ्याकडून केवळ भाषेची चूक झाली, राष्ट्रपतींचा अपमान करण्याचा माझा हेतू नव्हता. त्यांची व्यक्तिश: माफी एकवेळ मागेन. परंतु भाजपच्या पाखंडी खासदारांची मुळीच माफी मागणार नाही असे अधीर रंजन चौधरी यांनी निक्षून सांगितले आहे. 'सुंभ जळला तरीही पीळ काही सुटत नाही' या म्हणीसारखीच काँग्रेसची अवस्था झाली आहे. जनमत प्रतिकूल असतानाही ही गुर्मी त्यांच्यात कुठून येते असा प्रश्न पडतो. विरोधकांना तुच्छ लेखण्याचे हे राजकारणच काँग्रेसला नडले आहे. अहंकाराची भाषा सोडून जनतेचे प्रश्न मार्गी लावण्याचे प्रयत्न सुरू केले नाहीत तर काँग्रेसचे उरलेसुरले अस्तित्व देखील नष्टप्राय होईल हे वेगळे सांगायची गरज नाही.**

# नागरिकांनो, प्लास्टिक बंदीला साथ द्या!

केंद्र शासनाने १ जुलै २०२२पासून सिंगल युज प्लास्टिकवर बंदी घातली असून राज्यात या बंदीची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना नुकत्याच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे महाराष्ट्र हे सिंगल युज प्लास्टिक बंदी करणारे देशातील पहिले राज्य ठरल्याचे वृत्त आहे. मूळात प्लास्टिक उत्पादनांना प्राधान्य दिले जाते, कारण ते वापरण्यास अतिशय सोपे आहेत. एकदा वापरल्यानंतर ते फेकून दिले जाते. म्हणूनच ते खूप स्वस्तदेखील आहेत. पण प्लास्टिक वापरणे जितके सोपे आणि स्वस्त आहे तितकेच ते आपल्या पर्यावरणाला अधिक हानी पोहोचत आहे. दरम्यान सिंगल युज प्लास्टिक पूर्णपणे बंद होण्यासाठी नागरिकांनीही तेवढेच सहकार्य देणे गरजेचे आहे. विज्ञानाच्या प्रगतीसोबतच पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी प्रत्येक नागरिकांवर आहे. पर्यावरणाचे संतुलन न राखल्यास मानवाला त्याची भविष्यात मोठी किंमत चुकवावी लागणार आहे.



मानवी जीवनात पर्यावरण नसेल तर आयुष्यही संपेल, म्हणून जागतिक स्तरावर प्लास्टिक बंदीची मोहीम राबविली जात आहे. भारतातही अशा प्लास्टिकवर बंदी घालण्यात आली आहे, जी एकेरी वापराच्या म्हणजेच एकदा वापरल्यानंतर पुन्हा वापरता येणार नाही. मात्र आजही नागरिकांकडून तेवढा प्रतिसाद मिळत नाही. एकल वापराच्या प्लास्टिकला डिस्पोजेबल प्लास्टिकदेखील आपण म्हणू शकतो. याचा अर्थ असा की जेव्हा आपण कोणत्याही प्रकारच्या प्लास्टिकपासून बनवलेली उत्पादने वापरतो जी एकदा वापरल्यानंतर पुन्हा वापरता येत नाही, तेव्हा ती सर्व उत्पादने सिंगल यूज प्लास्टिक उत्पादने असतात. सिंगल युझ प्लास्टिक विकत घेण्यासाठी आणि वापरण्यासाठी फारसा खर्च येत नाही परंतु जेव्हा एकदा वापरल्यानंतर फेकून देतो तेव्हा त्याचा कचरा, साफसफाई आणि नष्ट करण्यासाठी खूप पैसे खर्च होतात. याचा विचार प्रत्येक नागरिकांनी केला पाहिजे. प्लास्टिकमुळे जगाचे होणारे नुकसान खूप मोठे आहे. कॅरी बॅग, प्लास्टिकच्या पाण्याच्या बाटल्या, प्लास्टिकचे कप, प्लेट्स, रिकामी खाद्यपदार्थांची पाकिटे, प्लास्टिकच्या किराणा पिशव्या, प्लास्टिकच्या पाण्याचे पाऊच, प्लास्टिकचे रॅपर, स्ट्रॉ आणि इतर प्रकारच्या प्लास्टिकच्या पिशव्या आदि वापरण्यावर नागरिकांचा कल कमी झालेला दिसत नाही. स्वस्त खरेदीमुळे आज ती जगातील सर्वाधिक वापरली जाणारी वस्तू बनली आणि मोठी डोकेदुखी ठरली. आज नागरिक 'वापरा आणि फेका' हे धोरण अधिक स्वीकारतात. परंतु नागरिकांना हे माहीत नसेल की पर्यावरणाने जगातील ९ अब्ज टन प्लास्टिकपैकी केवळ ९ टक्के प्लास्टिकचा पुनर्वापर केला आहे. आणि उर्वरित प्लास्टिकचा बहुतेक कचरा जलमार्गाद्वारे महासागरात जातो. तसेच इतर ठिकाणी फेकलेला असतो.

सारासार विचार केला तर प्लास्टिक हे नैसर्गिकरित्या तयार होणारे उत्पादन नाही. त्याऐवजी ते हळूहळू प्लास्टिकच्या लहान तुकड्यांमध्ये मोडतात ज्याला मायक्रोप्लास्टिक म्हणतात. पण त्याचा नाश होत नाही. यामध्ये एक प्रकारचा रासायनिक घटक आढळतो, जो मातीसह जलमार्गाने जलाशयात पोहोचतो आणि तेथे राहणाऱ्या प्राण्यांना हानी पोहोचवतो. ते जमिनीत किंवा पाण्यात विरघळत नाही. या कारणास्तव प्लास्टिक अत्यंत हानिकारक आणि नाशवंत आहे. काही प्लास्टिकच्या वस्तू जसे की पिशव्या इत्यादींचे विघटन होण्यास बराच वेळ लागतो. या दरम्यान ते आपली माती आणि पाणी दोन्ही प्रदूषित करतात याचा विचार नागरिकांना कुठेतरी करणे गरजेचे आहे. शासन स्तरावर केवळ बंदी आणून होणार नाही तर यात नागरिकांचे सहकार्य महत्त्वाचे आहे. प्लास्टिक तयार करण्यासाठी काही विषारी रसायने वापरली जातात जी प्रथम प्राण्यांच्या ऊतींमध्ये रूपांतरित होतात. आणि नंतर मानवी अन्न साखळीत प्रवेश करतात. मग या पदार्थांचे सेवन केल्याने ते आपल्या शरीरात पोहोचते आणि त्याचाही परिणाम होतो. असे प्लास्टिक प्राणी किंवा मानवाने खाल्ल्यास त्यांच्या मज्जासंस्थेला, फुफ्फुसांना आणि इतर काही अवयवांना मोठे नुकसान होऊ शकते. सजीव प्राणी आणि मानवी शरीराव्यतिरिक्त त्याचा पर्यावरणावरही परिणाम होतो. प्लॉस्टिकची उत्पादने मातीत मिसळली की, त्यामध्ये आढळणारी घातक रसायनेही मातीत मिसळतात. त्यामुळे त्या मातीत झाडे लावली की स्वतःच निर्माण



होतात, त्याचा विपरीत परिणाम होतो. आज समुद्र किनारी आणि पाण्यात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक आढळून येत आहे. याचा वेळीच विचार केला नाही तर २५ ते ३० वर्षांनी समुद्रात प्राण्यांपेक्षा प्लास्टिक जास्त दिसून येईल. जलचरांसाठी हे योग्य नाही. पर्यावरणाचे रक्षणकर्ते म्हणून प्रत्येक नागरिकांनी याची काळजी घेतली पाहिजे.

दरम्यान, प्लास्टिकच्या कचऱ्याचा पर्यावरणावर वाईट परिणाम होतो. जर आपण प्लास्टिकपासून बनवलेले कप, प्लेट्स, स्ट्रॉ आणि इतर तत्सम उत्पादने वापरत असाल तर ते सामाजिक जाण ठेवून ताबडतोब वापरणे थांबविले पाहिजे. आजही प्लास्टिकच्या पिशव्या बाजारात दिसून येतात. मात्र नागरिकांनी बाजारात जाताना घरातून बाहेर पडताना सोबत कापडी पिशवी ठेवावी. यामुळे प्लास्टिक पिशवी आपण दुकानदारांकडून नाकारुन शकतो. काही दुकानदारांचे असेही म्हणणे असते की, ग्राहक प्लास्टिक पिशव्यांची मागणी करतात. विज्ञानाच्या प्रगतीसोबतच पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी जर आपली नसेल तर मानवी आयुष्यात केलेली ही मोठी चूक असेल. भविष्यात मोठी किंमत आपल्याला मोजावी लागेल आणि वेळही निघून जाईल.

प्लॉस्टिक पिशव्या सामान्यतः लोक रोज वापरतात, परंतु तुम्हाला माहित आहे की प्लॉस्टिक पिशव्यांवर बंदी घालण्यात आली आहे. परंतु तरीही दैनंदिन जीवनात आपण किती वेळा प्लास्टिक पिशव्या वापरतो हे माहित नाही. प्लॉस्टिक पिशव्यांवर बंदी घालणे हे आपल्या पर्यावरणासाठी आणि आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. कारण दिवसेंदिवस प्लास्टिकच्या पिशव्या आपल्या जीवाला धोका निर्माण होत आहेत. सामान्यतः बनवलेल्या प्लास्टिकच्या पिशव्यांना आकार देण्यासाठी विषारी रसायनांचा वापर केला जातो, ज्याचा आपल्या आरोग्यावर आणि निसर्गावर मोठा परिणाम होतो. यामुळे प्लास्टिक बंदीला साथ देणे गरजेचे आहे.



## बदलते तंत्रज्ञान

### ५जी सिम असे असेल...

भारतात ५जी चे स्वप्न आता लवकरच पूर्ण होणार आहे. २६ जुलै रोजी भारतात ५जी स्पेक्ट्रम लिलाव झाला असून, रिलायन्स जिओ, एअरटेल आणि वोडाफोन आयडियासह अनेक मोठ्या टेक कंपन्यांना ५जी सेवा रोलआउट करण्यासाठी मंजुरी मिळाली आहे. ५जी स्पेक्ट्रमच्या लिलावानंतर सर्व कंपन्यांमध्ये ५जी नेटवर्क प्रथम आणण्यासाठी स्पर्धा होणार आहे. ५जी फोनने आधीच बाजारपेठेत आपले स्थान निर्माण केले आहे आणि सेवा सुरू होताच लोक सुपर फास्ट ५जी इंटरनेटचा आनंद घेऊ शकतील.

अनेकांनी ५जी फोन घेतले आहेत पण ५जी नेटवर्क आल्यानंतर ५जी सिम कसे मिळवायचे? आणि नवीन ५जी सिम कार्डवर जुना नंबर कसा चालवता येईल, हा मोठा प्रश्न उपस्थित होत आहे. तुम्हालाही ५जी सिम कार्डबद्दल उत्सुकता असेल, तर जाणून घ्या ५जी सिमशी संबंधित सर्व प्रश्नांची उत्तरे. सध्या बाजारात २जी, ३जी आणि ४जी असे तिन्ही प्रकारचे सिमकार्ड उपलब्ध आहेत. फीचर फोनमध्ये २जी सिम चालत असताना, स्मार्टफोन वापरकर्ते ३जी आणि ४जी दोन्ही सिम कार्ड चालवत आहेत. तुम्हाला हे जाणून आनंद मिळेल की ५जी सिमदेखील सध्याच्या ४जी सिम प्रमाणेच असेल आणि त्याच्या कोणताही बदल होणार नाही. इतकेच नाही तर तुम्ही सध्या ज्या कंपनीचे ४जी सिम चालवत आहात ती कंपनी ५जी नेटवर्क ठेवण्यास सक्षम असेल. तुम्ही फक्त ५जी फोनवर ५जी सिम चालवू शकता. इंटरनेटवर असे अनेक व्हिडीओ उपलब्ध आहेत ज्यात असा दावा केला जात आहे की ५जी सिम ४जी मोबाईलमध्येही काम करेल. मात्र प्रत्यक्षात आल्यावरच ते समजेल. जेव्हा ४जी लॉंच झाला तेव्हा २जी आणि ३जी फोनमध्ये ४जी सिम काम करत होत्या. पण हे सत्य नाही. २जी फोनमध्ये ४जी सिम बसवले जायचे पण त्यावर फक्त २जी सेवा मिळत होती. दुसरीकडे, जर जिओचे सिम २जी किंवा ३जी फोनमध्ये वापरले गेले असेल तर ते देखील चालले नाही. कारण काही कंपन्या ४जी सोबत २जी आणि ३जी सेवा देत होत्या तर काहीकडे फक्त ४जी सेवा होती. तथापि, अशी सेवा ५जी साठीदेखील उपलब्ध असेल. आज स्मार्टफोन वापरकर्त्यांसाठी मोठा प्रश्न आहे की, ५जी सेवा फक्त ४जी सिमवर उपलब्ध असेल की नवीन सिम घेण्याची आवश्यकता आहे. तर ते मात्र ऑपरेटरवर अवलंबून आहे. याचे कारण सिमचे तंत्रज्ञान काही नाही. सिमद्वारे, तुम्हाला फक्त एकच युनिक आयडी दिला जातो आणि त्या आयडीनुसार तुमच्या नंबरवर प्लॅन सक्रिय केला जातो. प्रत्यक्षात लवकरच याबाबत अपडेट माहिती पुढे येणार आहे. मोबाइल वापरकर्त्यांनी याकडे लक्ष ठेवावे.

# जे. आर. डी. टाटा यांचे कार्य अतुलनीय

जहांगीर रतनजी दादाभॉय टाटा उर्फ जे.आर.डी. टाटा यांचा जन्म २९ जुलै १९०४मध्ये पॅरिस, फ्रान्स येथे झाला. हे भारतीय उद्योजक होते. ते पहिले भारतीय वैमानिक असून, भारतातील विमान वाहतूक उद्योगाचे जनक मानले जातात.



रतनजी दादाभॉय टाटांचे ते दुसरे पुत्र होते. मुंबईमध्ये काही वर्ष ते शिकले, पण टाटांची आई फ्रेंच असल्यामुळे त्यांचे बालपण मुख्यत: फ्रान्समध्ये गेले. काही कारणाने ते मॅट्रीक परीक्षेपुढे शिकू शकले नाहीत. इंग्लिश खाडी विमानाद्वारे पहिल्यांदा पार करणारे सुप्रसिद्ध फ्रेंच वैमानिक लुईस ब्लेरिअट

**निमित्त**

यांच्या जीवनकार्याने जेआरडी टाटा खूप प्रभावित झाले होते. त्यामुळे त्यांनीही विमान शिकण्याचा ध्यास घेतला. १९२९ मध्ये त्यांनी वैमानिकाचा परवाना मिळवला. वैमानिकाचा परवाना मिळविणारे ते पहिले भारतीय ठरले. १९३२मध्ये त्यांनी टाटा एरलाईन्स या पहिल्या भारतीय प्रवासी विमानवाहतूक कंपनीची स्थापना केली. पुढे १९४६ मध्ये तिचे नाव बदलून एअर इंडिया ठेवले गेले.

वयाच्या अवघ्या ३४व्या वर्षी म्हणजे १९३८मध्ये ते टाटा सन्स उद्योगसमूहाचे चेअरमन बनले. ते प्रदीर्घ काळ त्या पदावर होते. त्यांनी पदभार सांभाळला तेव्हा टाटा सन्स उद्योगसमूहाच्या १४ कंपन्या होत्या. टाटांच्या काळात ९१ कंपन्यांची भर पडली. रसायन, वाहन, चहा, माहिती, हॉटेल आणि तंत्रज्ञान अशा नवीन क्षेत्रांत त्यांनी टाटा उद्योगसमूहाचा विस्तार केला. टाटांच्या पुढाकाराने १९५६मध्ये कंपनीतील कामगारांच्या कल्याणासाठी खास योजना राबविण्यात आली. त्यामध्ये 'दिवसातून आठ तास काम', 'मोफत आरोग्यसेवा', 'भविष्य निर्वाह निधी' आणि 'अपघात विमा योजना' अशा पायाभूत गोष्टींचा समावेश करण्यात आला होता. पुढे या योजना भारतीय केंद्र शासनाने सर्व उद्योग-व्यवसायांसाठी कायदेशीररित्या बंधनकारक केल्या.

टाटांच्या कारकिर्दीत उद्योगसमूहाच्या विस्ताराबरोबरच इतर अनेक संस्था स्थापन झाल्या. भारतात मूलभूत संशोधन व्हावे म्हणून त्यांनी १९३६मध्ये टाटा समाजविज्ञान संस्था आणि १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्था या संशोधन संस्था स्थापण्यात पुढाकार घेतला. आशियातील पहिले कर्करोग रुग्णालय १९४१मध्ये त्यांनी मुंबईत सुरू केले. आज मुखत्वे अनेक गरजूंना त्याचा लाभ मिळत आहे. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. भारतीय केंद्रशासनातर्फे त्यांना इ.स. १९५७ मध्ये पद्मविभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले तर १९९२ मध्ये त्यांना भारतरत्न हा भारतातील सर्वोच्च नागरी सन्मानाने भूषविण्यात आले. त्यांच्या कार्याची दखल भारताने तर घेतलीच पण जगालाही घ्याची लागली. २९नोव्हेंबर १९९३ मध्ये वयाच्या ८९व्या वर्षी जिनेव्हा, स्वित्झर्लंड येथे वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले.



**क्लिक...क्लिक...!** **सध्या निसर्ग हिरवागार झाला आहे. सगळीकडे वातावरण आल्हाददायक वाटत आहे. कर्नाळा किल्ला आणि परिसरातील हे दृश्य टिपले आहे, छायाचित्रकार लक्ष्मण ठाकूर यांनी.**

## आरोग्य प्रहर

### पाणी, दूध पिण्याची चुकीची पध्दत वेळीच घ्या जाणून!

आयुर्वेदानुसार खाण्यापिण्याबाबत अशा अनेक गोष्टी आहेत, ज्यांचे पालन न केल्यास व्यक्तीमध्ये आरोग्याशी संबंधित अनेक समस्या निर्माण होऊ लागतात. यातील एक समस्या म्हणजे पाणी आणि दूध पिण्याची चुकीची पद्धत.



उभे राहून दूध आणि बसून पाणी का प्यावे हे आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत. दूध प्यायल्यानंतर जर तुम्हाला तुमचे पोट फुगल्यासारखे वाटत असेल किंवा तुम्हाला गॅस होऊ लागलाय असे वाटत असेल तर त्यामागे दूध पिण्याची चुकीची पद्धत कारणीभूत ठरू शकते. आयुर्वेदानुसार खाण्यापिण्याबाबत अशा अनेक गोष्टी आहेत, ज्यांचे पालन न केल्यास व्यक्तीमध्ये आरोग्याशी संबंधित अनेक समस्या निर्माण होऊ लागतात. यातील एक समस्या म्हणजे पाणी आणि दूध पिण्याची चुकीची पद्धत. उभे राहून दूध प्यावे आणि बसून पाणी प्यावे हे आपल्या आयुर्वेदात सांगितले जाते. उभे असताना दूध आणि बसून पाणी पिण्याचा सल्ला का दिला जातो ते जाणून घेऊया.

**उभे राहून दूध का प्यावे?**

आयुर्वेदानुसार दूध थंड, वात आणि पित्त दोष संतुलित ठेवण्याचे काम करते. जे लोक बसून दूध पितात त्यांना पचनाचा त्रास होतो. यामुळेच आयुर्वेदात रात्री झोपण्यापूर्वी किंवा संध्याकाळच्या जेवणानंतर दोन तासांनी कोमट दूध उभे राहून पिण्याचा सल्ला दिला जातो जेणेकरून व्यक्तीला त्याचा पूर्ण फायदा मिळू शकेल आणि आरोग्याशी संबंधित समस्यादेखील उद्भवणार नाहीत.

**बसून पाणी का प्यावे?**

आयुर्वेदानुसार, उभे राहून पाणी प्यायल्याने अन्न आणि हवेच्या पाईपमध्ये ऑक्सिजनचा पुरवठा थांबतो. ज्याचा परिणाम फक्त फुफ्फुसावरच नाही तर हृदयावरही होतो. याशिवाय उभे राहून पाणी प्यायल्यास, पाण्याच्या जास्त प्रमाणामुळे पोटाच्या खालच्या बाजूच्या भिंतींवर दाब निर्माण होतो, ज्यामुळे पोटाच्या सभोवतालच्या अवयवांचे मोठे नुकसान होते. या वाईट सवयीमुळे अनेकांना सांधेदुखी आणि हर्नियाचा त्रास सहन करावा लागतो. न थांबता पाणी प्यायल्याने ॲसिडीटी, गॅस, ढेकर येणे यासारख्या समस्याही होतात. उभे राहून कधीही पाणी पिऊ नका. नेहमी बसून पाणी प्या. अभ्यासानुसार, बसून पाणी प्यायल्याने पाण्याचे योग्य पचन होते. त्यामुळे बसून पाणी पिणे चांगले मानले जाते. ही माहिती सामान्य आधारावर देण्यात आली आहे.

# अखेर जेएनपीए प्रशासन झुकले

## भाजप पदाधिकाऱ्यांमुळे कंत्राटी कामगारांच्या पगार वाढीचा करार पूर्ण

**उरण : रामप्रहर वृत्त**

जेएनपीएमधील कॉन्ट्रॅक्ट (कंत्राटी) वर्कर्सच्या वेतन कराराबाबत कामगार नेते सुधीर घरत यांनी घेतलेली आक्रमक भूमिका व आमदार महेश बालदी यांच्या यशस्वी मध्यस्तीने जेएनपीए प्रशासन अत्यंत जलद गतीने कार्यरत होऊन कॉन्ट्रॅक्ट वर्कर्स पगारवाढीचा करार जेएनपीए जनरल कामगार संघटनेसोबत मंगळवारी जेएनपीए प्रशासन भवन येथे झाला.

गेली २७ महिने ९५० कामगारांचा प्रलंबित असलेला पगारवाढीचा प्रश्न जेएनपीए जनरल कामगार संघटनेने ऐरणीवर आणला. २९ जुलै २०२२ पासून काम बंद आंदोलनाची नोटीस प्रशासनाला दिली होती, त्यामुळे प्रशासन हादरले. २६ जुलै रोजी जेएनपीए चेअरमन संजीव सेठी यांनी पगारवाढीच्या प्रस्तावावर सही करून बुधवारी (दि. २७) पगारवाढीचा करार जेएनपीए जनरल कामगार संघटनेसोबत करावा अशा सुचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. त्याप्रमाणे बुधवारी वेतन वाढीच्या करारावर जेएनपीए जनरल कामगार संघटनेच्या वतीने अध्यक्ष सुरेश पाटील, कार्याध्यक्ष सुधीर घरत, सरचिटणीस जनार्दन बंडा यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या वेळी प्रशासनाच्या वतीने मुख्य व्यस्थापक जयंत ढवळे, व्यवस्थापक मनीषा जाधव, एस. एस. पगारे, संतोष मोरे हे अधिकारी उपस्थित होते.

या नवीन वेतन करारामुळे कामगारांना किमान वेतन रुपये २३,५७० व कमाल वेतन रुपये ३३,७६० मिळणार आहे. यापूर्वी कामगारांना राज्य सरकारच्या किमान वेतन कायद्यानुसार किमान वेतन मिळत होते, परंतु या करारामध्ये केंद्र सरकारच्या किमान वेतन कायद्यानुसार किमान वेतन मिळणार आहे, तसेच यापूर्वी न मिळणारी ग्रॅच्युइटी, ८.३३ टक्के बोनस, मेडीक्लेम सुविधा यांचा नव्याने समावेश झाला आहे याचे सारे श्रेय समाजातील शेवटच्या घटकाला न्याय मिळावा याकरिता कायम प्रयत्नशील असणाऱ्या दमदार आमदार महेश बालदी यांचे आहे, असे सुधीर घरत यांनी सांगितले. संपूर्ण उरण तालुक्याचे लक्ष लागून राहिलेल्या या वेतन कराराबद्दल सर्वच थरातुन व कामगार वर्गातून कामगार नेते सुधीर घरत व सुरेश पाटील यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दरम्यान, जेएनपीए चेअरमन संजीव सेठी, व्हाईस चेअरमन उन्मेष वाघ, मुख्य व्यस्थापक जयंत ढवळे यांचे आभार सुरेश पाटील यांनी मानले आहेत.



**आमदार महेश बालदींची महत्त्वाची भूमिका**

*नवीन वेतन करार व्हावा याकरिता अत्यंत महत्त्वाची भूमिका आमदार महेश बालदी यांनी निभावली, तसेच नवीन वेतन करार हा भारतीय मजदूर संघाच्या विचारांना अनुसरून वागणाऱ्या कामगारांच्या एकतेचा विजय आहे, असे कामगार नेते सुरेश पाटील म्हणाले.*

**अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. नवीन वेतन करार हा फक्त आमच्या संघर्षाचा विजय असून कुणीही फुकटचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करू नये.**

**–सुधीर घरत, कामगार नेते**

# सानपाड्यातील नाला कायमस्वरूपी बंदिस्त करा

## भाजपच्या सुनील कुरकुटे यांची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा सेक्टर ९ येथील मिलेनियम टॉवर ते सेक्टर ११ येथील एलोरा फिएस्टापर्यंतचा नाला कायमस्वरूपी बंदिस्त करण्यासाठी भाजपचे माजी 'ड' प्रभाग समिती सदस्य सुनील कुरकुटे यांनी महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांना पत्र दिले.



सानपाडा सेक्टर ९ येथील मिलेनियम टॉवर ते सानपाडा–जुईनगर सेक्टर ११ येथील एलोरा फिएस्टा टॉवरपर्यंत मागील बाजूला असलेला नाला उघडा असल्याने आजूबाजूच्या परिसरातील रहिवाशांना प्रचंड त्रास होत आहे.

या नाल्यात आजूबाजूच्या सोसायटीतील सांडपाणी मोठ्या प्रमाणात सोडले जाते. हा नाला पुढे मोठ्या नाल्याला जाऊन मिळतो, तसेच एमआयडीसीतील केमिकल युक्त रसायन या मोठ्या नाल्यात सोडले जाते. त्यामुळे आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली असून साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होण्यास सुरुवात झाली आहे. या दुर्गंधीचा परिसरातील रहिवाशांना मोठा सामना करावा लागत असून दुर्गंधीमुळे रहिवाशांचे आरोग्य आता धोक्यात आले असल्याचे कुरकुटे यांनी आयुक्तांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

पावसाळ्यात या नाल्यातून पाण्याचा योग्य निचरा होत नसल्याने अनेकदा नाल्यातील सांडपाणी रस्त्यावर येत आहे. याबाबत स्थानिक रहिवाशांनी कुरकुटे यांच्याकडे सातत्याने तक्रारी केल्या. त्या तक्रारीच्या अनुषंगाने सानपाडा सेक्टर ९ येथील मिलेनियम टॉवर ते सानपाडा–जुईनगर सेक्टर ११ येथील एलोरा फिएस्टा टॉवर पर्यंत मागील बाजूला असलेला नाला कायमस्वरूपी बंदिस्त करावा, अशी मागणी कुरकुटे यांनी आयुक्तांना पत्रातून केली आहे; अन्यथा स्थानिक रहिवाशांना सोबत घेऊन महापालिकेच्या विरोधात जनआंदोलन करण्याचा इशारा कुरकुटे यांनी आयुक्तांना पत्रातून दिला आहे.

# महापालिका शाळांतील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रगतीचे दार खुले



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांना शालेय स्तरावरील नियमित परिक्षांप्रमाणेच सध्याच्या स्पर्धेच्या युगात विविध स्पर्धा परिक्षांमध्येही सहभागी होण्याची संधी देऊन लहानपणापासूनच त्यांच्या क्षमतेला व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येते. या अनुषंगाने महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांना इयत्ता पाचवी व आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत तसेच आर्थिक दुर्बल घटकांसाठी असलेल्या राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षेत सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते व त्यादृष्टीने त्यांना अभ्यास साहित्य उपलब्ध करून देऊन त्यांची तयारीही करून घेतली जाते.

सन २०२१–२२ या शैक्षणिक वर्षात महानगरपालिकेच्या शाळांतील १३९ विद्यार्थ्यांनी या शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये प्राविण्य संपादन केलेले आहे. या गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी व प्रगतीसाठी उपयोगी ठरतील अशा बाबी प्रोत्साहन म्हणून उपलब्ध करून देण्याच्या भूमिकेतून महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या निर्देशानुसार शिक्षण विभागामार्फत विविध योजनांचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये शिष्यवृत्ती परिक्षा व आर्थिक दुर्बल घटकांसाठी असलेल्या राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांना नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने दरमहा ६०० रुपये इतक्या रक्कमेची शिष्यवृत्ती पुढील तीन वर्षांकरिता लागू करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे या विद्यार्थ्यांचे अनुभवविश्व विकसित व्हावे व त्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी पूरक गोष्टी अनुभवता याव्यात यादृष्टीने या शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांना इस्त्रोसारख्या नामांकित वैज्ञानिक संस्थेची शैक्षणिक सहल घडविण्याचे निश्चित करण्यात आले आहे. तसेच शैक्षणिक पाठ्यपुस्तकांच्या पलिकडे जाऊन या विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी व आजच्या झपाट्याने बदलत्या युगातील अद्ययावत माहिती व ज्ञान त्यांच्याकडे असावे या दृष्टीने शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांची वैज्ञानिक मासिकाची वर्गणी तीन वर्षांकरिता भरण्यात येणार आहे.

याशिवाय सध्याच्या माहिती तंत्रज्ञान युगात इंटरनेटव्दारे सारे जग आपल्या हातातील मोबाइलमध्ये अवतरलेले असताना या शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रयोजनार्थ मोबाईल प उपलब्ध करुन देण्यासाठी १० हजार रुपयांपर्यंतचे आर्थिक सहाय्य देणेबाबत अभिनव योजना सुरू करण्यात येत आहे.

नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत सन २०२२–२३ पासून शिष्यवृत्ती परीक्षा व आर्थिक दुर्बल घटकांसाठीची राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षा यामध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांना या उल्लेखनीय योजना लागू करण्यासाठी महापालिका आयुक्त बांगर यांची मान्यता लाभलेली असून याद्वारे महानगरपालिका शाळांतील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रगतीचे दार खुले झाले आहे.

# वाजेकर महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांसाठी सेमिनार, नोकरभरती

**पनवेल : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयात महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेल व आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयसीआयसीआय व एनआयआयटी तर्फे महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांसाठी सेमिनार व नोकरभरतीचे आयोजन करण्यात आले होते. प्रास्ताविक आयक्यूएसीचे प्रमुख डॉ. आर. बी. पाटील यांनी केले, तर पाहुण्यांची ओळख प्लेसमेंट सेलचे चेअरमन डॉ. आमोद ठक्कर यांनी केले.



आयसीआयसीआय–एनआयआयटीचे रिजनल मॅनेजर निरंजन मोहिते यांनी उपस्थित सर्व इच्छुक उमेदवारांना मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. त्याचबरोबर मुलाखत देण्यासाठी कशी तयारी करावी या विषयावरही विस्तृत विवेचन केले.

आयसीआय सी आय–एनआयआयटीचे डेप्यूटी मॅनेजर आशिष राऊत हे उपस्थित होते. त्यांनीही विद्यार्थ्यांचे समुपदेशन केले तसेच विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक मुलाखती घेतल्या. या उपक्रमात सुमारे १०८ इच्छुक उमेदवार उपस्थित होते.

प्रत्यक्ष मुलाखतीतून त्यांचे कल व आवड लक्षात घेऊन व त्यांचे शैक्षणिक गुणवत्ताही लक्षात घेऊन प्रत्यक्षात ३३ विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेतून निवड झालेल्या योग्य उमेदवारांना तीन आठवड्यांचे प्रशिक्षण देऊन प्रत्यक्ष नेमणूक देण्याची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

या कार्यक्रमासाठी आयसीआयसीआय–एनआयआयटीच्या सिद्धी दिवेकर यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. पी. जी. पवार यांनी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवित असलेल्या उपक्रमांची माहिती करून दिली. उपस्थितांचे आभार उपप्राचार्य डॉ. विलास महाले यांनी मानले. उमेदवारांच्या मुलाखती व लेखी परीक्षेचे नियोजन डॉ. झेलम झेंडे व प्रा. भूषण ठाकूर यांनी केले. सूत्रसंचालन दीक्षिता म्हात्रे व प्रांजल भोईर यांनी केले.

# लिमये सार्वजनिक वाचनालयाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि.२४) सुनीता एस. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झाली.



सभेच्या सुरुवातीस ज्ञात–अज्ञात मृत्यू झालेल्या सभासदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. रायगड जिल्हा ग्रंथालय संघ अलिबाग संघाचे अध्यक्ष संजय बोंदार्डे यांचे स्वागत करण्यांत आले. संस्थेच्या अध्यक्षा सुनीता जोशी यांनी प्रास्ताविक केले. यामध्ये वाचनालयासंदर्भात माहिती देताना त्यांनी सांगितले की, वाचनालयाची वेळ सकाळी ८.३० ते रात्री ८.०० अशी करण्यात आली असून नाममात्र शुल्कदरात अभ्यासिका सुरू करण्यात आली आहे. कोरोना काळात रोख देणगी स्वरुपात व पुस्तकाच्या स्वरुपात देणगी देणाऱ्यांचे आभार मानले. सह.कार्यवाह जयश्री शेट्ये यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले. सन २०२१–२०२२ या करीताचा वार्षिक अहवालाचे वाचन कार्याध्यक्ष विनायक वत्सराज यांनी केले. कार्यवाह काशिनाथ जाधव यांनी उत्पन्न खर्च व ताळेबंद पत्रक यांचे वाचन केले. सन २०२२–२०२३मधील अंदाजपत्रकाचे वाचन अॅड. माधुरी थळकर यांनी केले.

संस्थेकरिता तयार करणेत आलेल्या नवीन योजनेच्या प्रगतीची माहिती अध्यक्ष सुनीता जोशी यांनी दिली. सन २०२२–२०२३ करीता लेखापरीक्षकाची नेमणूकीचा ठराव उपाध्यक्ष श्याम वालावलकर ह्यांनी मांडला. कार्यकारीणीचा कार्यकाल संपल्याने निवडणूक अधिकारी मोहन मुझुमदार यांच्या देखरेखीखाली निवडणूक प्रक्रिया याच वेळी पर्ण करण्यात आली. सुनीता जोशी यांचे एकमेव पॅनल या ठिकाणी बिनविरोध निवडण्यात्त आले असून अध्यक्षपदाची धुरा सुनीता जोशी यांच्यावर देण्यात आली असून उपाध्यक्ष श्याम शांताराम वालावलकर, कार्याध्यक्ष विनायक नरहर वत्सराज, कार्यवाह काशिनाथ लक्ष्मण जाधव, सहकार्यवाह जयश्री राजेंद्र शेट्ये, कार्यकारीणी सदस्य अॅड. माधुरी राजन थळकर, हिमालिनी गिरीष कुलकर्णी, हेमा दिलीप गद्रे, प्रशांत गजानन राजे, सुनील नथुराम खेडेकर, रमेश धोंडू चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

उपस्थित सभासदांचे आभार मानून वाचनालयाच्या बिल्डिंगसाठीची भविष्यकाळासाठीची तरतूद अगोदरच करुन ठेवण्यात आली असून सभेस उपस्थित सभासदांची त्यासाठी मदत लागेल. निर्मला म्हात्रे यांनी बिल्डिंग फंडासाठी २५०० रुपये देणगी जाहीर करून त्यासाठी पनवेलमधील प्रतिष्ठिताची मदत घेऊ असे सभेपुढे सांगितले. संस्थेच्या अध्यक्ष सुनीता जोशी यांनी या वेळी उपस्थित सभासदाचे आभार मानले. सभेचे सूत्रसंचालन हिमालिनी कुलकर्णी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रशांत राजे यांनी मानले.

# नवी मुंबई महापालिकेचा स्वच्छतेकडे कल

## सहा टप्प्यांमध्ये विभागवार स्वच्छ मंथन स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ सर्वेक्षण २०२३ ला प्रारंभ करताना सूक्ष्म नियोजन करण्याकडे पालिकेडून विशेष लक्ष दिले जात आहे. विभाग कार्यालय पातळीवर अधिक चांगले काम व्हावे यादृष्टीने स्वच्छ मंथन ३.० या अंतर्गत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विभागांमधील ही स्पर्धा १ जुलै २०२२ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत ६ टप्प्यांमध्ये राबविण्यात येत असल्याचे आयुक्त अभिजित बांगर यांनी जाहीर केले आहे.




स्वच्छ मंथन ३.० ही विभाग कार्यालय स्तरावरील स्वच्छता स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. याबाबत संबंधित सर्व अधिकाऱ्यांशी संवाद साधत आयुक्त अभिजित बांगर यांनी स्पर्धेची माहिती दिली. या स्पर्धेसाठी स्वच्छताविषयक २१ निकष असणार असून हे निकष स्वच्छ सर्वेक्षणाच्या परीक्षणाच्या निकषांना अनुरुप असणार आहेत. सहा टप्प्यांमधील या स्पर्धेचा प्रत्येक टप्पा हा ४५ दिवसांचा असणार असून यामध्ये विभागांमार्फत कार्यवाहीचा कालावधी ३० दिवस, कार्यवाहीची माहिती गुगलशीटमध्ये दाखल करण्याचा कालावधी सात दिवस व सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने त्याचे मुख्यालय स्तरावरून क्षेत्रीय तपासणी व परीक्षण करण्याचा कालावधी सात दिवस असणार आहे.

प्रत्येक टप्प्यानंतर त्या टप्प्यातील सर्वोत्कृष्ट विभाग जाहीर केला जाणार आहे. त्यांना स्वच्छ मंथन फिरता चषक प्रदान केला जाणार आहे. जाहीर केलेल्या सहा टप्प्यांमध्ये हा चषक प्रत्येक टप्प्यातील गुणांकनानुसार सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विभागाकडे जाणार असून सहा टप्पे पूर्ण झाल्यानंतर सर्वाधिक वेळा फिरता चषक पटकाविणाऱ्या विभागास गौरविण्यात येऊन त्यांच्या कार्यक्षेत्रात स्वच्छता विषयक उपक्रम राबविण्यासाठी पारितोषिक स्वरुपात रक्कम प्रदान केली जाणार आहे. त्याचप्रमाणे विभागांनी मागील वर्षीच्या तुलनेत किती प्रमाणात स्वच्छता विषयक कामाची गुणवत्ता उंचाविली याचाही अंतिम गुणांकनात विचार केला जाणार आहे.

दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे निर्मितीच्या ठिकाणीच वर्गीकरण केले जाणे अनिवार्य असून ज्या सोसायट्या आपला कचरा वर्गीकरण करून देणार नाहीत त्या सोसायट्यांचा कचरा महापालिकेमार्फत संकलीत केला जाणार नाही अशी स्पष्ट भूमिका आयुक्तांनी यावेळी व्यक्त केली. १०० टक्के कचरा वर्गीकरण होणे अपेक्षित असून तसे स्पष्ट संदेश सोसायट्यांचे पदाधिकारी यांना द्यावेत, असेही आयुक्तांनी निर्देशित केले. याशिवाय विभागांमध्ये एकाही जागी उघड्यावर कचरा टाकला जाणार नाही याची काटेकोर काळजी घेऊन अशा जागा असूच नयेत याचेही बारकाईने नियोजन करण्याच्या सूचना आयुक्तांनी केल्या. स्वच्छता स्पर्धेच्या परीक्षणामध्ये अशा जागा आढळल्यास नकारात्मक गुणांकन असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या वेळी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले, संजय काकडे, प्रशासन विभागाचे उपायुक्त जयदीप पवार, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, परिमंडळ १ चे उपायुक्त दादासाहेब चाबुकस्वार व परिमंडळ २चे उपायुक्ता डॉ. अमरिश पटनिगीरे हे प्रत्यक्ष तसेच आठही विभागांचे विभाग अधिकारी वेब प्रणालीव्दारे उपस्थित होते.




# रायगडातील नऊ नगर परिषदांची आरक्षण सोडत

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील नऊ नगर परिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी गुरुवारी (दि. २८) आरक्षण सोडत काढण्यात आली. नगरसेवक पदाच्या एकूण १९६जागांपैकी ४३जागा ओबीसी प्रवर्गासाठी, १२ जागा अनूसुचित जातींसाठी तर ११ जागा अनूसुचित जमातीसाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यातील खोपोली, अलिबाग, महाड, माथेरान, मुरूड जंजिरा, पेण, रोहा, श्रीवर्धन आणि उरण नगर परिषदांची सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. त्यासाठी गुरुवारी आरक्षण सोडत काढण्यात आली. या नऊ नगरपालिकांच्या एकूण १९६ जागांपैकी १३० जागा सर्वसाधारण गटासाठी राखून ठेवण्यात आल्या. त्यापैकी ६० जागा महिलांसाठी आरक्षित असणार आहेत. ओबीसींच्या ४३पैकी २५जागा महिलांसाठी आरक्षित असणार आहेत. तर अनूसुचित जातीच्या १२पैकी आठ जागा महिलांसाठी तर अनूसुचित जमातींच्या ११पैकी सहा जागा महिलांसाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत.



खोपोली नगर परिषदेच्या ३१जागांसाठी निवडणूक होणार आहे. यातील २४जागा सर्वसाधारण गटासाठी, अनूसुचित जातींसाठी तीन, असूचित जमातीसाठी एक, तर ओबीसी प्रवर्गासाठी तीन जागा राखीव आहेत.

अलिबाग नगरपालिकेच्या २० पैकी ११ जागा खुल्या प्रवर्गासाठी, एक अनूसुचित जाती, तीन अनूसुचित जमाती, पाच जागा ओबीसींसाठी राखीव असणार आहेत. महाड नगरपालिकेच्या २०पैकी १४ जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी, एक अनूसुचित जातीसाठी, तर पाच ओबीसी प्रवर्गासाठी राखीव असणार आहेत.

माथेरान नगर परिषदेच्या २०पैकी १२ जागा खुल्या प्रवर्गासाठी, तीन अनूसुचित जाती, एक अनूसुचित जमाती, पाच जागा ओबीसी प्रवर्गासाठी राखीव असणार आहेत. मुरूड जंजिरा नगर परिषदेच्या २०पैकी १२जागा खुल्या प्रवर्गासाठी, तीन अनूसुचित जमातींसाठी, पाच ओबीसींसाठी राखीव असणार आहेत. पेण नगरपालिकेच्या २४पैकी १६जागा खुल्या प्रवर्गासाठी, एक अनूसुचित जाती, एक अनूसुचित जमाती, सहा जागा ओबीसींसाठी राखीव असणार आहेत. रोहा नगरपालिकेची २०पैकी १५ जागा खुल्या प्रवर्गासाठी, तर पाच जागा ओबीसींसाठी राखीव असणार आहेत.

श्रीवर्धन येथील २०पैकी १२ जागा खुल्या प्रवर्गासाठी, एक जागा अनूसुचित जाती, दोन अनूसुचित जमाती, पाच जागा ओबीसींसाठी आरक्षित असणार आहेत. तर उरण नगरपालिकेच्या २१पैकी १४जागा खुल्या प्रवर्गासाठी, दोन अनूसुचित जाती, पाच जागा ओबीसींसाठी राखीव झाल्या आहेत.

नऊ नगरपालिका एकूण १९६जागांपैकी ५०टक्के जागा महिलांसाठी आरक्षित असणार आहेत. त्यात खुल्या प्रवर्गासाठी ६०जागा, अनूसुचित जातीसाठी आठ, अनूसुचित जमातीसाठी सहा, तर ओबीसी प्रवर्गातील महिलांसाठी २५ जागा राखीव असणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नगरपालिका प्रशासन विभागामार्फत देण्यात आली.

## महाडमध्ये टेम्पो, ॲक्टिव्हामध्ये अपघात

**महाड : प्रतिनिधी**

महाड औद्योगिक क्षेत्रातील प्रिव्ही कारखान्यासमोर गुरुवारी (दि. २८) संध्याकाळी ४ वाजण्याच्या सुमारास महिंद्रा टेम्पो आणि ॲक्टिव्हा यांच्यात अपघात झाला.

**एक ठार, एक जखमी**

त्यात ऍक्टिव्हावरील एक जण जागीच ठार झाला असून एक महिला गंभीर जखमी झाली आहे.

गुरुवारी २८ रोजी संध्याकाळी ४ वाजण्याच्या सुमारास महाड दिशेला येणारा महेंद्र टेम्पो (एमएच-४३,बीएक्स-४५०७) हा प्रिव्ही कारखान्यासमोर आला असता त्याच दिशेला येणाऱ्या ऍक्टिव्हा(एमएच-०६,बीजे-९९५३) वरील चालक ज्ञानेश्वर प्रभाकर फडतरे (रा. महाड) यांचा ताबा सुटला आणि ते टेम्पोच्या मागच्या चाकाखाली येऊन जागीच ठार झाले. ॲक्टिव्हावर मागे बसलेली त्यांची पत्नी वर्षा फडतरे या गंभीर जखमी झाल्या असून त्यांना महाड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## ‘त्या’ तीन वाड्यांचा वीजपुरवठा १५ दिवसांनी सुरळीत

### कर्जत तालुक्यातील चौधरवाडी, जांभूळवाडी, जाधववाडी पुन्हा उजळल्या

**कर्जत : बातमीदार, प्रतिनिधी**

महावितरणचे दोन ट्रान्स्फार्मर जळाल्याने मोग्रज (ता. कर्जत) ग्रामपंचायत हद्दीतील चौधरवाडी, जांभूळवाडी आणि जाधववाडी या तीन आदिवासी वाड्यांचा वीजपुरवठा १५दिवसापासून खंडित झाला होता. तेथे नवीन ट्रान्स्फार्मर कार्यान्वीत केल्यानंतर त्या तीन आदिवासी वाड्यांचा वीजपुरवठा मंगळवार (दि. २६)पासून सुरळीत झाला आहे.

मुसळधार पावसात कर्जत तालुक्यातील चौधरवाडी आणि जाधववाडी येथील दोन ट्रान्स्फार्मर जळाल्याने त्या परिसरातील तीन आदिवासी वाड्या मागील दोन आठवड्यांपासून अंधारात बुडाल्या होत्या. चौधरवाडी, जांभूळवाडी आणि जाधववाडीमधील आदिवासी ग्रामस्थांना विजेशिवाय राहावे लागते होते. तेथील आदिवासी ग्रामस्थ तसेच परिसरातील फार्महाऊस मालकांनी खंडित वीजपुरवठा सुरु करण्यासाठी महावितरण अधिकाऱ्यांच्या वारंवार भेटी घेतल्या. मात्र तालुक्यात अनेक ठिकाणी विजेचे खांब कोसळले आहेत, त्यामुळे मुख्य वीजपुरवठा सुरु केल्यानंतर आदिवासी भागातील विजेचा प्रश्न सोडवायला जाईल, असे उत्तर देण्यात येत होते.

दरम्यान, महावितरणचे कर्जत येथील सहाय्यक अभियंता प्रकाश देवके यांच्या मार्गदर्शनाखाली मोग्रज ग्रामपंचायत हद्दीमधील चौधरवाडी येथे ६३ केव्हीए आणि जाधववाडी येथे २५ केव्हीए क्षमतेचे नवीन ट्रान्स्फार्मर बसविण्यात आले. त्यामुळे तब्बल १५ दिवसानंतर मंगळवारी चौधरवाडी, जांभूळवाडी आणि जाधववाडी या तीन आदिवासी वाड्यांत विजेचा प्रकाश पडला.

परिसरातील विजेचा भार लक्षात घेता चौधरवाडी आणि जाधववाडी या दोन्ही ठिकाणी १०० केव्हीए क्षमतेचे ट्रान्स्फार्मर बसविण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे.

**या परिसरातील गावे आणि फार्महाऊसच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे पूर्वी बसविलेले ट्रान्स्फार्मर आताच्या वाढत्या विज मागणीच्या तुलनेत अपुरे पडत आहेत. त्यामुळे तेथील विजपुरवठा वारंवार खंडित होत आहे. तेथे जादा क्षमतेचे ट्रान्स्फार्मर बसविणे गरजेचे आहे.**

**– प्रकाश देवके, उप अभियंता, महावितरण कर्जत**

## दासगावमध्ये हुंड्यासाठी विवाहितेचा छळ

### सासरच्या मंडळींविरोधात गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

माहेरून हुंडा आणण्यासाठी सासरची मंडळी अमानुष छळ करीत असल्याची तक्रार दासगाव मोहल्ला येथील विवाहितेने केल्याने तिच्या सासरच्या मंडळींविरोधात महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अमरिन सुफियान बळी (वय २५) हिचा विवाह दासगावमधील सुफियान सुजामुद्दीन बळी याच्याशी २०१९ मध्ये मुस्लिम रिती-रिवाजाप्रमाणे झाला होता. लग्नामध्ये पतीसह सासरच्या मंडळींनी दहा लाख रुपये हुंडा व मोटरसायकल, फ्रिज, वॉशिंग मशीन इत्यादी वस्तू मुलीच्या वडिलांकडे मागितल्या होत्या. लग्नानंतर आपण मागणी पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्याप्रमाणे पीडित मुलीच्या वडिलांनी मोटरसायकल घेण्यासाठी दोन लाख रुपये व वॉशिंग मशीन दिले. मात्र दीड वर्ष झाल्यानंतर सासरच्या मंडळींनी माहेरून दहा लाख रुपये व अन्य वस्तू आणण्याचा तगादा लावला. परंतु आपल्या वडिलांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने सध्या आपण रक्कम देऊ शकत नाही असे तिने सासरच्या मंडळींना वारंवार विनंती करून सांगितले. त्यामुळे सासरच्यांनी तिचा छळ करण्यास सुरुवात केली. मारहाण करणे, मानसिक छळ, खोलीमध्ये डांबून ठेवणे, दोन दोन दिवस उपाशी ठेवणे असे अमानुष प्रकार तिच्या बाबतीत सुरू करण्यात आले. अखेरीस पीडित विवाहित महिलेने महाड शहर पोलीस ठाण्यात पती सुफियान बळी, सासरा सुजामुद्दीन दाऊद बळी, सासू हसमत बळी (सर्व रा. दासगाव), नणंद समीना इम्रान ताज (रा. महाड), सिमिन असिफ गैबी (रा. मोरबा, ता. माणगाव) या पाच जणांच्या विरोधात तक्रार दाखल केली. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## किसान सन्मान योजनेच्या लाभार्थ्यांसाठी आता ई-केवायसी बंधनकारक

**म्हसळा तालुक्यात फक्त ४०टक्के लाभार्थ्यांचे झाले ई-केवायसी**




**म्हसळा : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री किसान सन्मान योजने अंतर्गत लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांना आता आपले बँक खाते ई-केवायसी करुन घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्याकरिता ३१जुलै ही अंतिम तारीख आहे. त्यापूर्वीच या योजनेच्या म्हसळा तालुक्यातील सर्व लाभार्थ्यांनी आपले बँक खाते ई-केवायसी करुन घ्यावे, असे आवाहन तहसीलदार समीर घारे यानी केले आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्याना वर्षाकाठी त्यांच्या बँक खात्यावर सहा हजार रुपये जमा केले जातात. शेतकऱ्यांना शेती कामात त्याचा उपयोग व्हावा, हा केंद्र सरकारचा उद्देश आहे. या योजनेच्या लाभार्थ्यांनी आपले आधार कार्ड व मोबाईल नंबर घेवून, जवळचे आधार केंद्र, ई-सुविधा केंद्र, महा ई-सेवा केंद्र या ठिकाणी आपल्या खात्याची ई-केवायसी करुन घ्यावे. बँक खाते ई-केवायसी करुन न घेतल्यास म्हसळा तालुक्यातील लाभार्थ्यांचा प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा पुढील महिन्याचा हप्ता जमा होणार नाही, असे समजते.

दरम्यान, म्हसळा तालुक्यात ई-सुविधा केंद्र, महा ई-सेवा केंद्र केवळ २० असून स्थानिक पातळीवर अनेक भागात कनेक्टीव्हीटी नसल्याने अडचणींना तोंड द्यावे लागते, तर सेवा केंद्रात ई-केवायसी करण्यासाठी किमान ३० ते १००रुपये शुल्क आकारले जात असल्याचे पुढे येत आहे. म्हसळा तालुक्यातील सुमारे ६७१२शेतकरी प्रधानमंत्री किसान योजनेचे लाभार्थी असून, त्यापैकी ४० टक्के शेतकऱ्यांचे ई-केवायसी झाले असल्याचे समजते.

**म्हसळा तालुक्यात प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचे काम पारदर्शक आणि गतीमान होण्यासाठी महसूल आणि कृषी विभागाने मेळावे घ्यावेत आणि शेतकऱ्यामध्ये जनजागृती करावी.**

**–कृष्णा कोबनाक, सदस्य, महाराष्ट्र प्रांत भाजप**

## नागोठण्यात शॉक लागून वायरमनचा मृत्यू



**नागोठणे : प्रतिनिधी**

उच्चदाब वाहिनीचा धक्का लागून महावितरणचे नागोठणे येथील वायरमन धर्मराज विठ्ठल भोसले (वय ३२) यांचा गुरूवारी (दि. २८) मृत्यू झाला.

महावितरणच्या नागोठणे कार्यालयातील वायरमन धर्मराज भोसले गुरुवारी शहरातील आयटीआयच्या मागच्या बाजूस असलेला ऐबी स्विच बंद करण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांना उच्चदाब वाहिनीचा धक्का लागला. त्यांना तातडीने नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले, तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ. आदित्य शिरसाट यांनी त्यांना मृत घोषित केले. भोसले यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, आई, वडील, भाऊ, बहीण असा परिवार आहे.

## रायगड किल्ल्यावर स्वच्छता मोहीम

### मुंबईतील मी मराठी वाहनचालक संघटनेचा उपक्रम



**महाड : प्रतिनिधी**

मुंबईमधील मी मराठी वाहनचालक संघटनेच्या वतीने रविवारी (दि. २४) किल्ले रायगड संवर्धन आणि स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. त्यासाठी संघटनेच्या सदस्यांनी पावसातदेखील श्रमदान केले.

रायगडावर शनिवार आणि रविवारी पावसाचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांची गर्दी होत आहे. यामुळे गडावर मोठ्या प्रमाणात खाद्यपदार्थांची रिकामी पाकिटे, पाण्याच्या रिकाम्या बाटल्या पडत आहेत. पावसाळी पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी आलेल्या मी मराठी वाहनचालक संघटनेच्या लक्षात ही बाब येताच त्यांनी त्वरित गड स्वच्छता करण्यास प्रारंभ केला. संघटनेचे अध्यक्ष सतीश मगर यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेचे उपाध्यक्ष जगन्नाथ चिकणे, कार्याध्यक्ष नामदेव गायकवाड, संस्थापक जयेश नाईक यांच्यासह अन्य पदाधिकारी व सभासद या स्वच्छाता मोहिमेत सहभागी झाले होते.

## पेणमध्ये कारगिल विजय दिन उत्साहात



**पेण : प्रतिनिधी**

सह्याद्री प्रतिष्ठान, महात्मा गांधी वाचनालय व माजी सैनिक सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पेण मधील महात्मा गांधी वाचनालयात मंगळवारी (दि. २६) कारगील विजय दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

महात्मा गांधी वाचनालयाचे अध्यक्ष अण्णा वनगे, कार्याध्यक्ष अप्पा सत्वे यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर अमर जवान स्मृतीचिन्हास माजी सैनिकांच्या हस्ते पुष्पचक्र वाहण्यात आले. त्यानंतर मौन राखून हुतात्म्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. या वेळी अण्णा वनगे यांनी परमवीरचक्र प्राप्त अब्दुल हमीद यांच्या आठवणींना उजाळा दिला. तर कारगील युध्दामध्ये सहभागी असलेल्या सुरेंद्र ठाकूर यांनी कारगील युध्दाच्या आठवणी सांगितल्या. या वेळी जितेंद्र नाकती, हरिश्चंद्र वातेरे, नरेश पाटील, लहू म्हात्रे, संतोष धांडे, गणेश म्हात्रे, मिलींद बोचरे, विशाल पाटील, भूषण कडू यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

## बेकरे शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

**कर्जत : बातमीदार**

नवी मुंबईतील श्री साई ट्रस्ट तर्फे कर्जत तालुक्यातील बेकरे येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

श्री साई ट्रस्टचे अध्यक्ष गणेश अय्यर, ट्रस्टच्या विश्वस्त रिद्धी गाला, राधिका घुले आदींच्या हस्ते बेकरे शाळेतील विद्यार्थ्यांना वही, रंगपेटी, कंपास पेटी, पेन्सिल, खोडरबर आदी साहित्याचे वाटप करण्यात आले.

बेकरे शाळेत झालेल्या या कार्यक्रमाला माणगाव ग्रामपंचायतच्या सरपंच कल्याणी कराळे, ग्रामपंचायत सदस्य कारले, जयेंद्र कारले, मुख्याध्यापक दिलीप घुले यांच्यासह शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.



## माणगावची प्रसिद्ध काकडी बाजारात दाखल!

**माणगांव : प्रतिनिधी**

पावसाळ्यात तयार होणारी, खायाला रुचकर व चवदार असणारी खवय्यांच्या पसंतीची माणगाव तालुक्यात पिकणारी काकडी बाजारात विक्रीसाठी आली आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्यानंतर काकडी बहरू लागली असून या काकडीच्या घाऊक व किरकोळ विक्रीला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

विवीध फळ भाज्या, भाजीपाला, कलिंगड व काकडी लागवडीसाठी माणगाव तालुका प्रसिद्ध असून पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात काकडीची लागवड केली जाते. डोंगर उतारावर खास पद्धतीचे आळे करून आणि मांडव घालून शेतकरी काकडीची लागवड करतात. पावसाळ्याच्या दिवसात दुसरे कोणतेच फळ पीक घेता येत नसल्याने शेतकरी काकडीचे उत्पादन घेतात. या दिवसात काकडीला चांगली मागणी असते.

पावसाळ्यात येणारे सण, उत्सव, उपवास, व्रत वैकल्ये यासाठी फळांची मोठ्या प्रमाणात मागणी असते, ही बाब लक्षात घेऊन माणगाव तालुक्यातील शेतकरी दरवर्षी काकडीचे उत्पादन घेतात. विशेष करून श्रावण महिन्यात व गणेशोत्सव काळात काकडीला मोठी मागणी असते.

माणगाव तालुक्यात गेले काही दिवस चांगला पाऊस झाल्याने काकडीच्या वेली तरारून आल्या आहेत.रुचकर, चविष्ट माणगाव काकडीला चांगली मागणी आहे. येथील काकडी पनवेल, महाड, पेण येथील बाजारात विक्रीसाठी जातात. काकडीचे भाव गेल्या वर्षी ४० रुपये प्रति किलो होते. या वर्षी ५ ते १० रुपये भाववाढ झाली आहे.



**पावसाचा जोर कमी झाल्याने गेल्या काही दिवसांत काकडी बहरू लागली आहे. यावर्षी किरकोळ विक्रीसाठी ४० ते ५०रुपये प्रति किलो दर आहे. तर घाऊक विक्रीसाठी २५ ते ३० रुपयांचा दर आहे. काकडी बाजारात येण्यास आता सुरुवात झाली आहे. गोकुळाष्टमी, गणपतीपर्यंत काकडीला चांगला बाजार मिळेल.**

**–रामदास जाधव, काकडी उत्पादक विक्रेता, माणगाव.**

## नागोठणे लायन्स क्लबच्या अध्यक्षपदी डॉ. अनिल गिते

**नागोठणे : प्रतिनिधी**

लायन्स क्लब नागोठणेच्या अध्यक्षपदी डॉ. अनिल गिते, उपाध्यक्षपदी पांडुरंग शिंदे, सचिवपदी विवेक सुभेकर तर खजिनदारपदी संतोष शहासने यांची निवड करण्यात आली. त्यांचा शपथग्रहण सोहळा नुकताच हॉटेल इंद्रप्रस्थमध्ये झाला.



सुनिल कुथे यांनी लायन्स प्रतिज्ञा वाचून कार्यक्रमाची सुरुवात केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विवेक सुभेकर यांनी केले. नवीन सदस्य दीपक गायकवाड, नुपूर गायकवाड, शंकर चव्हाण, ऋतुजा पांचाळ, अमित मोदी, सिध्देश काळे, विमला जैन, अजित काळे, अजिंक्य कोते, दीपक लोणारी, वरद उपाध्ये, निलेश सुकाळे, सुशिल राजिवले यांना नवीन कवळे यांनी शपथ देवून लायन्स क्लबच्या कार्यप्रणालीची माहिती दिली.

क्लबचे नवीन अध्यक्ष डॉ. अनिल गिते, उपाध्यक्ष पांडुरंग शिंदे, सचिव विवेक सुभेकर, खजिनदार संतोष शहासने यांच्यासह कार्यकारणीच्या इतर सदस्यांना संजीव सुर्यवंशी यांनी शपथ दिली. डॉ. अनिल गिते, रिजन चेअरमन महेश मोघे यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी लायन परिवारातील गुणवंत विद्यार्थी प्रतिक मरजे, नुपूर गायकवाड, सुजित चौलकर, ऐश्वर्य पांचाळ, निशिगंधा शिंदे, पार्थ करडे, रिद्धी शिंदे, अंतरा गायकवाड, अंजली चव्हाण, पुर्वा शहासने, क्रिश मोदी, स्वामिनी सुकाळे यांचा सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता कुथे यांनी केले. डिस्ट्रीक्ट चेअरमन यशवंत चित्रे, चार्टड प्रेसिडेट प्रकाश जैन, दौलत मोदी, सुधाकर जवके, विलास चौलकर, सुजाता जवके, विवेक करडे, श्वेता सुभेकर, श्वेता चौलकर, पूजा शिंदे, विशाल शिंदे हे सदस्य उपस्थित होते. मावळते अध्यक्ष सुजित महागावकर यांनी आभार मानले.

# टीम इंडियाचा विंडीजवर दमदार विजय

## ३-० ने मालिका खिशात



**त्रिनिनाद : वृत्तसंस्था**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात तिसरा एकदिवसीय सामना पोर्ट ऑफ स्पेन येथे खेळला गेला. शेवटच्या एकदिवसीय सामन्यात वेस्ट इंडिजचा ११९ धावांनी पराभव करीत भारताने ३-० ने मालिका खिशात घातली. शिखर धवनने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. पावसामुळे शुभमन गिलच्या कारकिर्दीतील पहिले आंतरराष्ट्रीय शतक अवघ्या दोन धावांनी हुकले. शुभमन गिलच्या नाबाद ९८ धावांच्या जोरावर भारताने ३६ षटकांत २२५ धावा केल्या.

वेस्ट इंडिजला पावसामुळे ३५ षटकांत विजयासाठी २५७ धावांचे लक्ष्य मिळाले. धावसंख्येचा पाठलाग करताना संपूर्ण संघ १३७ धावांत गारद झाला. भारताकडून युझवेंद्र चहलने चार, मोहम्मद सिराज आणि शार्दुल ठाकूर यांने प्रत्येकी दोन गडी बाद केले. अक्षर पटेल आणि प्रसिद्ध कृष्णाला प्रत्येकी एक विकेट मिळाली. शुभमन गिलने ९८ चेंडूत दोन षटकार आणि सात चौकारांच्या मदतीने नाबाद ९८ धावांची खेळी केली. त्याने कर्णधार शिखर धवन (५८) सोबत पहिल्या विकेटसाठी ११३ आणि दुसऱ्या विकेटसाठी श्रेयस अय्यर (४४) सोबत ८६ धावांची भागीदारी केली. सामनावीर व्यतिरिक्त त्याला मालिकावीर म्हणूनही गौरविण्यात आले.

शिखर धवनने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. गिलच्या साथीने धवनने संघाला चांगली सुरुवात करून दिली. दोन्ही खेळाडूंनी मिळून ११३ धावांची भागीदारी केली. धवनला बाद करून भारताला पहिला धक्का वॉल्शने दिला. धवन वैयक्तिक ५८ धावा करून बाद झाला. यानंतर पावसामुळे दोन तास खेळ थांबला. पाऊस थांबल्यानंतर भारताने श्रेयस अय्यर (४४) आणि सूर्यकुमार यादव (८) यांच्या रूपाने आणखी दोन विकेट गमावल्या. दुसऱ्यांदा पाऊस थांबला तेव्हा गिल ९८ धावांवर परतला, भारतीय डाव पावसाच्या पावसात संपुष्टात आला आणि विंडीजला २५७ धावांचे लक्ष्य मिळाले.

लक्ष्याचा पाठलाग करताना मोहम्मद सिराजने दुसऱ्याच षटकात दोन धक्के देत यजमानांना बॅकफूटवर ढकलले. ब्रेंडन किंग आणि निकलोस पूरनने प्रत्येकी ४२ धावा केल्या तर शे होपने २२ धावा केल्या. या तिघांशिवाय विंडीजच्या एकाही फलंदाजाला १० धावांचा टप्पा ओलांडता आला नाही.

### गिलने १०४ मीटर लांब षटकार मारला

टीम इंडियासाठी शुभमन गिल आणि कर्णधार शिखर धवन यांनी पहिल्या विकेटसाठी शतकी भागीदारी करीत संघाला दमदार सुरुवात करून दिली. गिलने त्यादरम्यान कारकिर्दीतला सर्वात लांब लचक १०४ मीटर षटकार मारला. गिलचा षटकार इतका लांब होता की, चेंडूच हरवला आणि पुन्हा सापडला नाही. भारतीय सलामीवीर गिलने डावाच्या १५व्या षटकात हेडन वॉल्शच्या चेंडूवर लाँग षटकार मारला.

# सुरज वशिष्ठला ३२ वर्षांनी सुवर्णपदक



**इटली : वृत्तसंस्था**

भारताचा १६ वर्षीय कुस्तीपटू सूरज वशिष्ठने ग्रीको-रोमन अंडर-१७ वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला आहे. सूरजने ५५ किलो वजनी गटात हे यश मिळवले. ३२ वर्षांनंतर अंडर-१७ वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये कुस्तीत सुवर्णपदक जिंकणारा तो पहिला भारतीय कुस्तीपटू ठरला आहे.

सूरज वशिष्ठने ५५ किलो वजनी गटात हे यश मिळवले आहे. यासह ३२ वर्षांनंतर अंडर-१७ वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये कुस्तीत सुवर्णपदक जिंकणारा तो पहिला भारतीय कुस्तीपटू ठरला आहे.

१९९०मध्ये पप्पू यादव चॅम्पियन झाला तेव्हा भारताने या स्पर्धेत शेवटचे सुवर्णपदक जिंकले होते. ३२ वर्षांपासून सुरू असलेला हा दुष्काळ आता सूरजने संपवला आहे. सुरजने युरोपियन चॅम्पियन फरीम मुस्तफेववर ११-० असा मोठा विजय मिळवला. सूरजने सामन्याच्या सुरुवातीपासूनच आक्रमणाला सुरुवात करत १-० अशी आघाडी घेतली. दुसऱ्या हाफच्या सुरुवातीलाच त्यांनी ३-० अशी आघाडी घेतली. युरोपियन कुस्तीपटूला पुनरागमनाची संधी नव्हती.

इतिहास रचल्यानंतर सूरज म्हणाला, मला माझ्या वजन प्रकारात जगातील सर्वोत्तम कुस्तीपटू व्हायचे आहे. सीनियर वर्ल्ड जेतेपद हे माझे स्वप्न आहे.

# रायफल शुटिंगमध्ये नमुंमपा शाळांमधील विद्यार्थी चमकणार

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी महानगरपालिका क्रीडा विभागाच्या माध्यमातून या क्षेत्रातील अत्यंत नावाजलेल्या खेळाडू व अनुभवी प्रशिक्षक सुमा शिरुर यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रशुद्ध प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.



याकरिता महापालिका शाळांमधील मुलामुलींची यादी शिक्षण विभागाच्या वतीने मागविण्यात आलेली आहे. यामधील ८५ मुले व ५१ मुलींची पात्रता फेरीची निवड चाचणी नुकतीच फादर ग्रल स्पोर्ट्स सेंटर येथील शुटिंग रेंजवर घेण्यात आली व निवड चाचणीमधून प्राथमिक फेरीमध्ये १४ मुले व १२ मुलींची निवड करण्यात आलेली आहे.

विशेष बाब म्हणजे पहिल्यांदाच रायफल हातात घेऊनसुद्धा टायमेटच्या जवळपास लक्ष्य साध्य करून अंगभूत क्रीडागुणांमुळे १४ मुले व १२ मुलींनी त्यांच्यातील गुणवत्तेचे दर्शन घडवित दखल घेण्यास भाग पाडले. रायफल शुटिंग खेळाबाबत केवळ बघून आणि वाचून असलेल्या विद्यार्थ्यांनी पहिल्यांदाच शुटिंग रेंजमध्ये हातामध्ये रायफल घेतल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

या पुढील काळात या मुलामुलींच्या अंतिम निवड चाचणीअंती १३ विद्यार्थ्यांना रायफल शुटिंगचे पुढील तंत्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात येणार असून यासाठीचा संपूर्ण खर्च महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणार आहे. रायफल शुटिंगसारख्या खेळामध्ये महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना खेळण्याची संधी देण्यात आली असून आगामी काळात राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर महानगरपालिकेचा नावलौकिक उंचावतील, असा विश्वास महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी व्यक्त करीत या विद्यार्थ्यांना पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छा प्रदान केल्या.

# ठाणे मनपा क्षेत्रात बनणार फुटबॉल प्रशिक्षण केंद्र

**ठाणे : प्रतिनिधी**

ओवळा-माजिवडा मतदारसंघात पाच फुटबॉल प्रशिक्षण केंद्र उभारणीस राज्य शासनाने मान्यता दिली असून प्रत्येकी एक कोटी रुपयांचा निधी राज्य शासनाने ठाणे महानगरपालिकेकडे वर्ग केला आहे. या प्रशिक्षण केंद्रामध्ये महापालिकेच्या माध्यमातून फुटबॉलचे मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रामध्ये अनेक फुटबॉल प्रेमी आहेत, परंतु प्रशिक्षणासाठी योग्य मैदान व जागा उपलब्ध नसल्याने क्रिडाप्रेमींची गैरसोय होत होती. क्रीडाप्रेमींकडून याबाबत मागणी होत होती. त्यामुळे शिंदे समर्थक आमदार प्रताप सरनाईक यांनी राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडे याबाबत निधी देण्याची मागणी केली होती. ही मागणी राज्य शासनाने मान्य करीत पाच प्रशिक्षण केंद्रे मंजूर केले आहेत. प्रत्येकी एका केंद्रासाठी एक कोटी याप्रमाणे पाच कोटी मंजूर केलेले आहे.

या निधीतून ठाणे महापालिका क्षेत्रातील ओवळा-माजिवडा मतदारसंघातील लोकमान्यनगर येथील रामचंद्र ठाकूर तरण तालवाजवळ, भिमनगर येथील म्हाडा वसाहतीजवळ, पवार नगर येथील प्रबोधनकार ठाकरे मैदानामध्ये, आनंदनगर जवळील स्वामी समर्थ मैदानामध्ये, वाघबीळ येथील मैदानाच्या आरक्षित भुखंडावर फुटबॉल प्रशिक्षण केंद्र उभारणीचे निश्चित झाले आहे.

**पनवेल : शिवाजीनगर ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष व मल्हार नेटवर्क प्रा. लि.चे संचालक कृष्णाशेठ ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, शकुंतला ठाकूर, महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अर्चना ठाकूर, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, कामगार नेते महेंद्र घरत यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी त्यांना बुधवारी शुभेच्छा दिल्या.**













# २०२४ ऑलिंपिकसाठी पॅरिसमध्ये उभे राहणार 'इंडिया हाऊस'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

TEAM INDIA | Reliance Foundation

क्रीडा जगतामध्ये ऑलिंपिक क्रीडा स्पर्धांना अनन्य साधारण महत्त्व आहे. या स्पर्धेमध्ये भारताला आतापर्यंत म्हणावी अशी कामगिरी करता आलेली नाही. भविष्यात या स्पर्धेत भारतातील जास्तीत जास्त खेळाडू सहभागी होती आणि पदकांची कमाई करतील यासाठी रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड (आरआयएल) आणि भारतीय ऑलिंपिक संघटनेने (आयओए) हातमिळवणी केली आहे.

याचाच एक भाग म्हणून आरआयएल आणि आयओए २०२४ ऑलिंपिकसाठी पॅरिसमध्ये पहिले-वहिले 'इंडिया हाऊस' स्थापन करणार आहेत. २०२४ पॅरिस ऑलिंपिकमध्ये भारताचे पहिले ऑलिंपिक हाऊस उभे राहणे, हा मैलाचा दगड ठरणार आहे. जागतिक खेळांमध्ये भारत प्रगती करत आहे, याचे हे उदाहरण ठरणार आहे. अधिकृत ऑलिंपिक हाऊस हे लाखो चाहत्यांना आणि पर्यटकांना संबंधित देशाचे खेळाप्रती असलेल्या धोरणांचा आढावा देते. याशिवाय, या माध्यमातून क्रीडा अधिकारी, क्रीडापटूंशी संवाद साधण्यासाठीही याची मदत होते.

भारतीय ऑलिंपिक संघटनेचे सरचिटणीस राजीव मेहता म्हणाले, भारतीय ऑलिंपिक संघटनेसोबतच्या या भागीदारीबद्दल आणि भारतीय खेळांना समर्थन देण्यासाठी मी रिलायन्स इंडस्ट्रीजच्या नीता अंबानी यांचे आभार मानतो. पॅरिसमध्ये भारताचे हाऊस, असणे ही एक महत्त्वाची बाब आहे.

# मुंबईच्या स्थानिक क्रिकेटपटूंना मानधन

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या स्थानिक क्रिकेट सामन्यांमध्ये खेळणाऱ्या क्रिकेटपटूंना प्रत्येक सामन्यासाठी चार हजार रुपये मानधन दिले जाणार आहे. कांगा लीग (नॉकआऊट स्पर्धेसह), आंतरमहाविद्यालयीन, कॉर्पोरेट शिल्ड या स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या क्रिकेटपटूंना हे मानधन मिळेल.

मुंबई क्रिकेट संघटनेच्या (एमसीए) बुधवारी झालेल्या कार्यकारी परिषदेमध्ये महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. याशिवाय मुंबईचे प्रतिनिधित्व करणाऱ्या माजी क्रिकेटपटूंच्या ७० वर्षांहून अधिक वयाच्या विधवा पत्नींसाठी प्रति महिना २० हजार रुपये निवृत्ती वेतन देण्याचे निश्चित करण्यात आले.

'एमसीए'ची वार्षिक सर्वसाधारण सभा आणि निवडणुकीची तारीख बदलून २६ ऑगस्ट निश्चित करण्यात आली आहे. याचप्रमाणे विशेष सर्वसाधारण सभेत जर मतभिन्नता झाल्यास घटनेच्या दुरुस्तीसाठी मतपत्रिकेद्वारे मतदान केले जाणार आहे, अशी माहिती 'एमसीए'च्या सूत्रांनी दिली.

# राष्ट्रकुल स्पर्धेत सिंधूला कोरोनाची धास्ती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्रकुल स्पर्धेसाठी भारतीय संघ रवाना झाला आहे. ऑलिंपिक पदक विजेत्या पीव्ही सिंधू नीरज चोप्राच्या अनुपस्थितीत भारताचा ध्वज आपल्या खांद्यावर घेणार आहे, मात्र याच पीव्ही सिंधूला कोरोनाची धास्ती वाटू लागली आहे. कारण तिच्या आरटीपीसीआर चाचणीच्या अहवालात गडबड दिसत असल्यामुळे तिला सध्या विलगीकरणात ठेवण्यात आल्याचे वृत्त टाईम्स ऑफ इंडियाने दिले.



भारताचा १० सदस्यीय बॅडमिंटनचा संघ बर्मिंगहमसाठी २५ जुलैला रवाना झाला. टाईम्स ऑफ इंडियाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पीव्ही सिंधूच्या आरटीपीसीआर चाचणीत काहीतरी गडबड दिसत आहे. ती राष्ट्रकुल स्पर्धेच्या व्हिलेजमध्ये दाखल झाली आहे, मात्र तिला निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आहे. पीव्ही सिंधूने गोल्ड कोस्ट राष्ट्रकुल स्पर्धेत रौप्य पदक पटकावले होते.

तिला आता इतर संघापासून विलगीकरणात ठेवले आहे. हे विलगीकरण दुसऱ्या कोरोना चाचणीचा अहवाल येईपर्यंत असणार आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com